cmyk

दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com | नवी दिशा... नवे विचार..... | email:rajyaloktantra75@gmail.com

● पुणे ● अहिल्यानगर ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–२०३ | गुरूवार दि.२० नोव्हेंबर २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### निवडणुकिची टांगती तलवार कायम !

महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे पडघम वाजू लागले असतानाच सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी राज्य सरकारला कडक इशारा दिला. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये ५० टक्क्यांपेक्षा जास्त आरक्षण देऊ नका, असा इशारा सुप्रीम कोर्टाने सोमवारी महाराष्ट्र सरकारला दिला.

# शेतकऱ्यांच्या खात्यात दोन हजार जमा !

**मुंबई । प्रतिनिधी**

पीएम किसान सन्मान निधी योजनेच्या २१ व्या हफ्त्याचे वितरण बुधवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्यात आले. यापूर्वी राज्य शासनाने ही अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना मदत म्हणून भरीव रक्कम वितरित करण्याचे काम केले आहे. या नवीन २१ व्या हप्त्यामुळे राज्यातील शेतकऱ्यांना लागवड, बियाणे, उपजीविका आणि इतर कृषी खर्चासाठी आवश्यक असे तातडीचे आर्थिक बळ मिळणार आहे. अशी प्रतिक्रिया राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली.



केंद्र सरकारच्या महत्वाच्या प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेअंतर्गत देशभरातील पात्र शेतकऱ्यांसाठी २१ वा हप्ता वितरीत करण्यात आला. ▶▶ पान २ वर

### “ रब्बी हंगामासाठी शेतकऱ्यांना मदत – भरणे

कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितले की, योजनेचा २१ वा हप्ता महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचा असून, या निधीमुळे रब्बी हंगामाच्या तयारीला मोठी मदत मिळेल. केंद्र सरकारकडून मिळणारे वेळेवरचे आर्थिक सहाय्य हे शेतकऱ्यांच्या स्थिर उत्पन्न व आर्थिक सुरक्षिततेसाठी अत्यावश्यक आहे, आणि योजनेच्या अंमलबजावणीत विभागामार्फत पूर्ण पारदर्शकता व समन्वय राखला जात आहे.

### “ राज्यातील ९० लाख ४१ हजार शेतकऱ्यांना लाभ

महाराष्ट्रात या योजनेचा मोठा लाभार्थी वर्ग असून, एकूण ९०,४१,२४१ पात्र शेतकरी कुटुंबांच्या खात्यात सुमारे १ हजार ८०८ कोटी २५ लाखांची रक्कम जमा झाली आहे. राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये कृषी विभाग, महसूल विभाग तसेच बँकिंग यंत्रणेने समन्वय राखत हप्त्याचे वितरण वेळेवर पार पाडण्यासाठी तयारी पूर्ण केली आहे. तसेच, शेतकऱ्यांना हप्ता मिळाला आहे की नाही हे तपासण्यासाठी सरकारने अधिकृत पोर्टल आणि मोबाइल ॲपद्वारे सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत.

# बीडमध्ये २४१ कोटीचा महसूल घोटाळा

## महसूल अधिकारी–कर्मचारी आणि वकिलाचे रॅकेट उघड

**बीड । प्रतिनिधी**

**बीड जिल्ह्यामधून जाणारे राष्ट्रीय महामार्ग त्याचबरोबर रेल्वे यासाठी संपादित केलेल्या जमिनीचा मावेजा मिळवण्यासाठी अतिरिक्त मावेजाची फाईल लवादाकडे सादर करत, महसूल विभागातील अधिकारी–कर्मचारी आणि वकील यांनी संगणमत करून जवळपास २४१ कोटी रुपयाचा घोटाळा केल्याचे उघडकीस झाले असून, खुद्द जिल्हाधिकाऱ्यांनी केलेल्या तपासणीनंतर संबंधितावर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.**





अपर जिल्हाधिकारी बीड, तहसीलदार (महसूल) जिल्हाधिकारी कार्यालय व उपजिल्हाधिकारी भूसंपादन यांच्यासह समन्वय भूसंपादन कार्यालय, जायकवाडी प्रकल्प भूसंपादन कार्यालय व उपविभागीय अधिकारी बीड या कार्यालयात भेट दिली. भेटी दरम्यान काही संचिका तपासल्या व काही संशयितांच्या मोबाईल मधील संभाषण आणि उपलब्ध माहितीवरुन समन्वय भूसंपादन कार्यालयातील लवाद / अपील प्रकरणात, जुन्या तारखा टाकून, तत्कालीन जिल्हाधिकारी यांचे नाव, पदनाम व स्वाक्षरी नमूद करून आदेश निर्गमित करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच ▶▶ पान २ वर

### या गैरप्रकारातील प्रमुख कर्मचारी

संजय हांगे (सहायक महसूल अधिकारी, तहसील कार्यालय परळी), अविनाश चव्हाण (कंत्राटी डाटा एन्ट्री ऑपरेटर, भूसंपादन समन्वय कार्यालय), शेख अजहर शेख बाबू (कंत्राटी ऑपरेटर भूसंपादन जायकवाडी प्रकल्प कार्यालय) व त्रिंबक पिंगळे (सेवानिवृत्त कंत्राटी कर्मचारी उपविभागीय अधिकारी कार्यालय बीड), पांडुरंग पाटील (सहायक महसूल अधिकारी, भूसंपादन समन्वय कार्यालय), राऊत (राष्ट्रीय महामार्ग कार्यालय), ॲड. एस. एम. नन्नवरे, ॲड. नरवडकर, ॲड. पिसूरे, ॲड. प्रवीण राख असल्याचे प्राथमिक चौकशीत दिसून आले आहे.



# पोलिस संरक्षणास जरांगेंचा नकार

**जालना । प्रतिनिधी**

माझ्या घातपाताचा कट रचणाऱ्या मुख्य सूत्रधारालाच सरकार चौकशीपासून आणि अटकेपासून वाचवत असेल तर मला अशा सरकारचे पोलीस संरक्षण नको, अशा अत्यंत कठोर शब्दांत मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर थेट निशाणा साधला आहे. जरांगे यांनी बुधवार, दि. १९ नोव्हेंबर रोजी अर्ज देऊन जालना पोलिस अधीक्षकांकडे आपले पोलिस संरक्षण तात्काळ काढण्याची मागणी केली आहे. ▶▶ पान २ वर

# निवडणूक आरक्षणावर मंगळवारी सुनावणी

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांमध्ये काही नगरपालिका, जिल्हा परिषदा, पंचायत समित्यांमध्ये ५० टक्क्यांपेक्षा अधिक आरक्षण आहे. याला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले होते. यावर १७ नोव्हेंबरच्या सुनावणीत सर्वोच्च न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त केली होती. बुधवारी यावर पुन्हा सुनावणी होणार होती. मात्र न्यायमूर्ती



जॉयमाल्या बागची उपस्थित नसल्याने सुनावणी आता मंगळवार, २५ नोव्हेंबर रोजी होणार आहे.

स्थानिक स्वराज्यसंस्थांमध्ये इतर मागासवर्गीयांसाठी (ओबीसी) सरसकट २७ टक्के आरक्षण लागू केल्याने आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा ही १७ जिल्हा परिषदा, ८३ पंचायत समित्या, दोन महानगरपालिका आणि ५७ नगरपालिका नगरपंचायती अशा १५९ स्थानिक ▶▶ पान २ वर

# बीडचे दोन्ही शिक्षणाधिकारी एकाच वेळी निलंबित

## शिक्षण विभागातील कोट्यावधीचा गैरव्यवहार अंगलट

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हा परिषद अंतर्गत माध्यमिक आणि प्राथमिक शिक्षण विभागामध्ये मान्यते विना तुकड्यांना मान्यता शिक्षक आणि शिक्षकेतर भरतीमध्ये लाखो रुपयांची माया जमा केल्याप्रकरणी बीड जिल्हा



परिषदेचे माध्यमिक शिक्षणाधिकारी नागनाथ जाधव आणि प्राथमिक विभागाचे शिक्षणाधिकारी भगवान फुलारी या दोघांनाही बुधवार दिनांक १९ नोव्हेंबर रोजी सेवेतून निलंबित करण्यात आले आहे. त्यांच्या निलंबनाचे आदेश महाराष्ट्र शासनाचे प्रधान सचिव रणजीत सिंह देवल यांनी काढले.


जिल्हा परिषदेच्या माध्यमिक विभागाचे शिक्षण अधिकारी नागनाथ फुलारी यांनी आपल्या कार्यकाळामध्ये अनेक संस्थांना तुकड्या वाढवल्या त्याबरोबरच शासनाची नोकर भरती बंद असताना, कोणतेही आदेश ▶▶ पान २ वर

# भारताला हिंदू राष्ट्र घोषित करणे आवश्यक–मोहन भागवत

**गुवाहाटी । वृतसंस्था**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रमुख मोहन भागवत यांनी गुवाहाटी येथे एका कार्यक्रमात बोलताना एक मोठे विधान केले आहे. त्यांच्या या विधानाची सध्या सगळीकडे चर्चा आहे. त्यांनी या ठिकाणी, ज्याला भारताचा अभिमान आहे तो हिंदू आहे. असे म्हटले आहे. भागवत यांनी हिंदू धर्माचे वर्णन केवळ धार्मिक नाही तर एक सभ्यता ओळख म्हणून देखील केली आहे. त्यांनी भारत आणि हिंदू एकच आहेत यावर भर दिला. त्यांनी भारताचे मूळतः ‘‘हिंदू राष्ट्र’’ असे वर्णन केले आणि चारित्र्य निर्माण एकतेचे आरएसएसचे ध्येय यावर भर दिला.

आरएसएस प्रमुख भागवत यांनी, ‘‘भारताला हिंदू राष्ट्र घोषित करण्याची गरज नाही; त्याची सभ्यता आधीच हे प्रतिबिंबित करते.’’ असे म्हटले. त्यांनी सांगितले की, ‘‘हिंदू हा केवळ एक धार्मिक शब्द नाही तर हजारो वर्षांच्या सांस्कृतिक परंपरेत रुजलेली एक सभ्यता ओळख आहे’’ तसेच पुढे बोलताना त्यांनी, ‘‘भारत आणि हिंदू समानार्थी आहेत. ‘‘हिंदू राष्ट्र’’ ▶▶ पान २ वर



## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१९ नोव्हेंबर २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|
| **गहू: ७.०० क्विंटल** | | |
| २,२०० | २,७९१ | २,५१६ |
| **ज्वारी/हायब्रिड: ७९.०० क्विंटल** | | |
| २,४१० | ४,००१ | ३,१८५ |
| **मका/लोकल: ५०.०० क्विंटल** | | |
| १,९५० | १,९५० | १,९५० |
| **तूर : ०.५० क्विंटल** | | |
| ३,००० | ३,००० | ३,००० |
| **उडीद : २७.०० क्विंटल** | | |
| ३,००० | ५,२५० | ४,४६४ |
| **बाजरी:२६.०० क्विंटल** | | |
| २,५०० | ३,००० | २,८१० |
| **मुग: २.०० क्विंटल** | | |
| ५,१०० | ५,७०० | ५,४०० |
| **सोयाबीन: ३१५.५० क्विंटल** | | |
| ३,९०० | ४,८०० | ४,५२५ |
| **हरभरा: ३.५० क्विंटल** | | |
| ४,००० | ४,१०० | ४,०५० |

## थोडक्यात...

### नितीश कुमारच बिहारचे मुख्यमंत्री

>> दिल्ली: बिहारमधील नवीन एनडीए सरकारचा शपथविधी सोहळा आज गुरूवारी (२० नोव्हेंबर) पाटण्यातील ऐतिहासिक गांधी मैदानावर होणार आहे. त्यापूर्वी, आज एनडीएची महत्वाची बैठक पार पडली, या बैठकीत नितीश कुमार यांना विधीमंडळ पक्षाचे नेते म्हणून निवडण्यात आले आहे. म्हणजेच, नितीश कुमार मुख्यमंत्री होणार, यावर अखेर शिक्कामोर्तब झाले आहे. भाजप नेते सम्राट चौधरी यांनी नितीश कुमार यांच्या नावाचा प्रस्ताव मांडला, जो एकमताने मंजूर करण्यात आला. आता नितीश कुमार राजभवनात जाऊन राजीनामा देतील आणि सरकार स्थापनेचा दावा करतील. तर, उद्या सकाळी भव्य शपथविधी सोहळ्यात १० व्यांदा मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतील. त्यांच्यासोबत सम्राट चौधरी आणि विजय सिंहा उप–मुख्यमंत्रिपदाची शपत घेतील.

### आम्हीच हल्ले केले : पाक नेत्याची उघड कबुली

>> दिल्ली: दिल्लीतील लाल किल्ल्याबाहेर १० नोव्हेंबर रोजी झालेल्या कार बॉम्ब स्फोटात १५ लोक ठार आणि डझनहून अधिक जखमी झाले होते. या स्फोटात पाकिस्तानचाच हात आहे, अशी कबुली पाकव्याप्त काश्मीर विधानसभेत राजकीय नेता चौधरी अन्वरुल हक याने दिली आहे. दिल्लीमध्ये झालेल्या कार बॉम्बस्फोट हा पाकिस्ताननेच घडविल्याचे हक याने दिलेल्या विधानावर स्पष्ट झाले आहे. विधानसभेत बोलताना चौधरी अन्वरुल हक म्हणाला की, ‘‘मी आधीही म्हटले होते की, जर तुम्ही (भारताने) बलुचिस्तानला रक्तबंबाळ करणे सुरू ठेवले, तर आम्ही तुम्हाला लाल किल्ल्यापासून काश्मीरच्या जंगलांपर्यंत धडा शिकवू.

### सिद्दीकी यांच्या हत्येचा सूत्रधार बिश्नोईला अटक

>> दिल्ली: गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजित पवार गट) नेते बाबा सिद्दीकी यांच्या हत्येप्रकरणी मुख्य सूत्रधार ठरलेला गँगस्टर अनमोल बिश्नोई याला राष्ट्रीय तपास संस्था (एनआयए)ने बुधवारी दिल्लीत अटक केली. अमेरिकेतून हद्दपार करून त्याला भारतात परत पाठवण्यात आले होते. अनमोल हा सध्या तुरुंगात असलेल्या कुख्यात गँगस्टर लॉरेन्स बिश्नोईचा भाऊ असून तो २०२२ पासून फरार होता. एनआयएच्या तपासानंतर त्याच्यावर मार्च २०२३ मध्ये आरोपपत्र दाखल करण्यात आले होते. याप्रकरणी अटक झालेला तो १९ वा आरोपी आहे.

### लग्नाचे अमिष देऊन ठेवलेले संबंध ‘बलात्कार’ नाही

>> तिरूअनंतपूरम: विवाहित महिलेला लग्नाचे आमिष दाखवून ठेवले शारीरिक संबंध हा बलात्काराचा गुन्हा ठरणार नाही, असे निरीक्षण नोंदवत केरळ उच्च न्यायालयाने ३८ वर्षांच्या पुरुषावरील बलात्कार आणि फसवणुकीची फौजदारी कारवाई रद्द करण्याचे आदेश दिला. बार अँड बेंचने दिलेल्या वृत्तानुसार, महिलेची २००९ मध्ये तरुणाशी ओळख झाली. त्यावेळी ती विवाहित होती. तरुणाने महिला आर्थिक मदत केली. लग्नाचे आश्वासन देऊन तिच्याशी लैंगिक संबंध ठेवले. महिल्याच्या पतीचे २०१३ मध्ये निधन झाले. यानंतर महिला तरुणासोबत राहत होती. याचवेळी तरुणाने दुसऱ्या महिलेशी विवाह केल्याची माहिती महिलेला मिळाली. महिलेच्या तक्रारीनुसार, तरुणावर भारतीय दंड संहिता, १८६० (आयपीसी) कलम ४९३ (फसवणूक ), ४९६ (फसवणूक विवाह) आणि ३७६ (बलात्कार) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. त्यानंतर त्याच्याविरुद्ध फौजदारी कारवाई सुरू करण्यात आली.

# वॉट्स ॲपचा डेटा लीक झाल्याची भिती

## साडेतीनशे कोटी लोकांची प्रायव्हसी धोक्यात?

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

**मेटा मालकीच्या व्हॉट्सॲपच्या सिस्टीममध्ये असलेल्या एका गंभीर त्रुटीमुळे तब्बल साडेतीनशे कोटी युजर्सचा फोन नंबर डेटा धोक्यात आला होता. ऑस्ट्रियातील सुरक्षा संशोधकांनी केलेल्या या खळबळजनक खुलाशानंतर, हा जगातील आतापर्यंतचा सर्वात मोठा डेटा लीक असल्याचा दावा करण्यात येत आहे.**

मोबाईलवर रात्री–अपरात्री येणारे मेसेज किंवा आकर्षक नोकरीच्या ऑफर्सचे मेसेज आता दुर्लक्ष करण्यासारखे राहिलेले नाहीत. व्हिएना युनिव्हर्सिटीच्या सुरक्षा संशोधकांनी केलेल्या शोधामुळे स्पष्ट झाले आहे की, व्हॉट्सॲपची संपूर्ण सदस्य





निर्देशिका बऱ्याच काळापासून असुरक्षित होती आणि ती डार्क वेबवर विकलीही जात होती. ऑस्ट्रियन संशोधकांचा दावा आहे की, ते ३.५ अब्ज वापरकर्त्यांचे फोन नंबर आणि इतर प्रोफाइल डेटा डाउनलोड केलेला असू शकतो. संशोधकांनी उघड केले की, त्यांनी एका तांत्रिक ▶▶ पान २ वर

### भारताला सर्वाधिक धोका

५० कोटींहून अधिक व्हॉट्सॲप वापरकर्ते असलेल्या भारतासाठी ही बाब अधिक चिंताजनक आहे. ग्लोबल डेटा स्क्रेपिंगमध्ये भारतीय नंबर सर्वात पहिले लक्ष्य केले जातात. गेल्या काही महिन्यांत +९२ (पाकिस्तान), +८४ (व्हिएतनाम) किंवा +६२ (इंडोनेशिया) कोड असलेल्या आंतरराष्ट्रीय नंबरवरून आलेल्या व्हिडिओ कॉल्सची वाढ याच डेटा स्क्रेपिंगचा परिणाम होता. या लीक झालेल्या डेटाचा वापर करून सायबर गुन्हेगार भारतात डिजिटल अरेस्ट स्कॅम्स, पार्ट टाइम जॉब फ्रॉड आणि स्पॅम कॉल्स करत आहेत.

# उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तडकाफडकी दिल्ली दरबारी

**मुंबई । प्रतिनिधी**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे बुधवारी तडकाफडकी दिल्लीला रवाना झाले. राज्यात भाजप आणि शिवसेना यांच्यातील संघर्ष वाढलेला असताना शिंदे दिल्लीत जावून भाजपच्या वरिष्ठ नेत्यांची भेट घेणार असल्याची माहिती आहे. शिंदेसेनेच्या मंत्र्यांनी मंगळवारी कॅबिनेट बैठकीवर बहिष्कार घातला होता. त्यानंतर शिंदेंचे मंत्री मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना भेटले. भाजपकडून शिंदेसेनेच्या माजी नगरसेवकांना पक्षप्रवेश दिला



जात असल्याने शिंदेंच्या मंत्र्यांनी नाराजी व्यक्त केली होती. या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर शिंदे दिल्लीला रवाना झाले.

बुधवारी पोलीस विभागाचा एक कार्यक्रम होता. त्याचे निमंत्रण एकनाथ ▶▶ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# निवडणुकिची टांगती तलवार कायम !

महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे पडघम वाजू लागले असतानाच सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी राज्य सरकारला कडक इशारा दिला. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये ५० टक्क्यांपेक्षा जास्त आरक्षण देऊ नका, असा इशारा सुप्रीम कोर्टाने सोमवारी महाराष्ट्र सरकारला दिला. राज्य सरकारने आरक्षणाची मर्यादा ओलांडल्यास निवडणुका रोखण्याचा इशाराही न्यायालयाने दिला आहे. निवडणुकांचे वेळापत्रक कोलमडावे अशी आमची इच्छा नाही, उलट निवडणुका वेळेतच पार पडल्या पाहिजेत, पण त्याचवेळी आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडता कामा नये असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे. सर्वोच्च न्यायालयाचे न्या. सूर्यकांत आणि जॉयमला बागची यांच्या खंडपीठाने सांगितले की, महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या जे. के. बांठिया आयोगाच्या २०२२ च्या अहवालापूर्वीची स्थिती पाहूनच घेता येतील.

या अहवालात इतर मागासवर्गीय (ओबीसी) प्रवर्गासाठी २७ टक्के आरक्षणाचा प्रस्ताव होता. सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांच्या विनंतीवरून याबाबतची सुनावणी १९ नोव्हेंबरला ठेवण्यात आली. मात्र, राज्य सरकारने ५० टक्क्यांच्या वर आरक्षण देऊ नये, असे खंडपीठाने पुन्हा अधोरेखित केले. खंडपीठाने स्पष्ट इशारा दिला, 'नामांकन प्रक्रिया सुरू असल्याचा युक्तिवाद केल्यास आणि न्यायालयाने आता हस्तक्षेप करू नये, असे म्हटल्यास आम्ही निवडणुका स्थगित करू, न्यायालयाची ताकद तपासू नका.' न्यायालयाने म्हटले, 'घटनेने ठरवलेल्या ५० टक्क्यांच्या मर्यादेपलीकडे जाण्याचा आमचा कधीही हेतू नव्हता. दोन न्यायाधीशांच्या खंडपीठाला ती मर्यादा ओलांडण्याचा अधिकार नाही. बांठिया आयोगाचा अहवाल अद्याप प्रलंबित आहे, त्यामुळे आम्ही पूर्वस्थितीनुसार निवडणुका घेण्यास मान्यता दिली.'

राज्यातील काही ठिकाणी ओबीसी आरक्षणासह एकूण आरक्षण ७० टक्क्यांपर्यंत पोहोचल्याच्या आरोपांवरही न्यायालयाने नोटीस काढली. केंद्र सरकारचे महाधिवक्ता मेहता यांनी सांगितले की, नामांकनाची शेवटची तारीख सोमवार होती आणि ६ मेच्या सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार निवडणुका घेण्याचा मार्ग मोकळा झाला होता. वरिष्ठ वकील विकास सिंह आणि नरेंद्र हुडा यांनी, आरक्षणाची मर्यादा ओलांडल्याचा दावा करताना म्हटले होते की, ४० टक्क्यांपेक्षा अधिक मतदारसंघांमध्ये ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडली गेली असून काही ठिकाणी ती ७० टक्क्यांपर्यंत पोहोचली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमधील राजकीय आरक्षण ठरविताना राज्य निवडणूक आयोगाने अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि महिलांसाठी अपूर्णांक जागा पुढील पूर्णांकात मोजायची तरतूद ठेवली असताना, ओबीसींसाठी मात्र हीच पद्धत न करण्याचा निर्णय घेतला. याला ओबीसी महासंघाने आक्षेप घेतल्यानंतर महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी राज्य निवडणूक आयोगाला पत्र लिहून नव्याने आरक्षण सोडत काढण्याची मागणी केली. राष्ट्रीय ओबीसी महासंघाने आक्षेप घेतल्यानंतर महसूलमंत्री बावनकुळेंनी राज्य निवडणूक आयोगाच्या आयुक्तांना लिहिलेल्या पत्रात अशी मागणी केली की, आयोगाने २४ ऑक्टोबर २०२५ रोजी काढलेल्या आदेशात दुरुस्ती करावी.

सर्व संवर्गांना समान न्याय द्यावा, भेदभाव होणार नाही याची काळजी घ्यावी, तसेच आदेशात दुरुस्ती करून नव्याने सोडत काढता येत असेल तर तशा सूचना द्याव्यात. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये इतर मागास प्रवर्गासाठी (ओबीसी) सरसकट २७ टक्के आरक्षण लागू करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला. त्यामुळे अनेक पालिकांमध्ये आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडली जात असल्याकडे सर्वोच्च न्यायालयाचे लक्ष वेधण्यात आले. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतील ओबीसी आरक्षणाबाबत विकास गवळी यांनी दाखल केलेल्या याचिकेवर न्या. सूर्यकांत आणि न्या. जॉयमला बागची यांच्या खंडपीठापुढे सुनावणी झाली. राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची रणधुमाळी सुरु असतानाच या निवडणुका पुन्हा एकदा वादात सापडल्या आहेत. निवडणुकांमध्ये आरक्षणाच्या ५० टक्के मर्यादेचे उल्लंघन झाल्याचा दावा करणा-या याचिकेवर आता सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होणार आहे. ही सुनावणी १९ नोव्हेंबर रोजी होणार आहे. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची अर्धी प्रक्रिया पूर्णत्वास आली आहे.

पुढील महिन्यात नगर परिषद आणि नगरपालिकांच्या निवडणुका होत आहेत. त्यानंतर पंचायत समिती, जिल्हा परिषद व महापालिकांच्या निवडणुकांची घोषणा होण्याची शक्यता आहे. याच दरम्यान आरक्षण मर्यादेच्या मुद्यावर सर्वोच्च न्यायालयात नवीन याचिका दाखल झाल्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पुन्हा एकदा वादात सापडल्या आहेत. राज्यातील ३२ जिल्हा परिषदा, ३३१ पंचायत समित्यांच्या निवडणुकीचा बिगुल ५ डिसेंबरपासून वाजेल असा अंदाज आहे. कारण त्या अनुषंगाने राज्यातील ११२ तहसीलदारांना उपजिल्हाधिकारीपदी पदोन्नती देण्यात आली आहे. नोव्हेंबरअखेर दुसरा टप्पा जाहीर करून ५ डिसेंबरपासून अर्ज स्वीकृतीचे नियोजन आहे. त्यानंतर सात दिवस अर्ज स्वीकृतीसाठी, सात दिवस अर्ज माघार, छाननी, अंतिम उमेदवार यादीसाठी असतील. प्रचारासाठी सहा दिवसांचा अवधी असेल आणि मतदान व मतमोजणी, विजयी उमेदवारांना प्रमाणपत्र वाटप हे सगळे ३१ डिसेंबरपर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन असल्याचे सांगितले जाते.

# सरकारी वकील लाचेच्या चक्रात अडकले

जालना । प्रतिनिधी

तक्रारदार यांचेवर दाखल गुन्ह्याच्या निर्दोष निकालानंतर मा. उच्च न्यायालयात अपील नाकारण्यासाठी सरकारी वकील शरद बांगर वय ४३ सहा सरकारी वकील, जिल्हा सत्र न्यायालय छत्रपती संभाजीनगर यांनी ३०,०००/-रुपये लाचेची मागणी केली माणून त्यांना ला.प्र.वि. जालना यांच्याकडुन पकडण्यात आले आहे.

शरद बांगर सहा सरकारी वकील, रा. फ्लॅट नंबर २. आदित्य रेसिडेन्सी, सातारा परिसर, छत्रपती संभाजीनगर सदरील घटना १७ नोव्हेंबर रोजी सत्र न्यायालय उत्रपती संभाजीनगर येथील सरकारी वकील यांचे कार्यालयात घडली यातील तक्रारदार यांचेवर पोलिस ठाणे जवाहरनगर, छत्रपती संभाजीनगर, येथे गुन्हा रजिस्टर नंबर ८१/२०२२ कलम ७ अ. प्र. का. प्रमाणे गुन्हा नोंद असून त्याचा निदोष निकाल १९/११/२०२४ रोजी लागला. सदर निर्दोष निकालानंतर त्यामध्ये मा. उच्च न्यायालयात अपील नाकारण्यासाठी आरोपी सरकारी वकील यांनी तक्रारदार यांचेकडे २,००,०००/- ची मागणी केली व त्यावेळी १,५०,०००/- रु पेलले व उर्वरीत ५०,०००/-रु तामदार यांचे सेवा निवृत्ती नंतर मिळणारे पैसे मिळाल्यानंतर अलोसे यांना देण्याचे ठरले. त्यानंतर आलोसे शरद बांगर यांनी त्यांचे असिस्टंट अभिमान करपे यांचे मोबाईल वरून तक्रारदार यांना वारंवार फोन करून राहिलेले ५०,०००/-रु देण्यासाठी तगादा लावला. तक्रारदार पांचो आलोसे यांना पैसे देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दि. १५.१०.२०२५ रोजी ला. प्र. वि. कार्यालय जालना येथे समक्ष हजर राहून लेखी तक्रार दिली होती. सदर तक्रारीवरुन न्यायालय छत्रपती संभाजीनगर येथील आलोसे पांचे कार्यालयात पंचासमक्ष पडताळणी केली असता आलोसे श्री शरद बांगर यांनी उच्च न्यायालयात अपील नाकारण्याच्या कामासाठीचे राहिलेले ५०,०००/-रु मध्ये तक्रारदार यांचे सोबत तडजोड करून ३०,०००/-रू स्वीकारण्याचे मान्य केले. दिनांक १८/११/२०२५ रोजी सापळा कारवाई आजमावण्यासाठी तक्रारदार यांना आलोसे यांचेकडे लाचेची रक्कम घेऊन पाठवले असता शरद बांगर यांनी लाच घेण्यास टाळाटाळ केली व तुम्ही तुमच्या वकिलांना भेटा असे सांगितले, त्यावरून तक्रारदार यांनी लाप्रवी कार्यालय जालना येथे येऊन आलोसे यांना माझा संशय आल्यामुळे ते आता माझ्याकडून लाच रक्कम स्वीकारणार नाहीत त्यांच्यावर पुढील कारवाई करावी असे कळवले. त्यावरान दि.१९.११.२०२५ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना चे पोलीस उप अधीक्षक श्री. बी. एस. जाधवर व त्यांचे पथकाने शरद बांगर यांना सत्र न्यायालय छत्रपती संभाजीनगर येथील त्यांचे कार्यालयात ताब्यात घेतले व अंगझडती घेतली असता एक रेडमी कंपनीचा मोबाईल मिळून आला. मोबाईल हॅन्डसेटच्या तपासणीची आवश्यकता वाटल्यास तो जप्त करण्याची तजवीज ठेवली आहे. आलोसे यांचे घरझडतीची प्रक्रीया चालू आहे. सरकारी वकील शरद बांगर यांचेवर पोलीस ठाणे वेदांतनगर, छत्रपती संभानीनगर येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे . सदरची कारवाई श्रीमती, माधुरी कांगणे, पोलीस अधीक्षक, छत्रपती संभाजीनगर, श्री. शशिकांत सिंगारे, अपर पोलीस अधीक्षक, छत्रपती संभाजीनगर, यांच्या मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी श्री. बी. एस. जाधवर, पोलीस उपअधीक्षक जालना, तपास अधिकारी, कोमल शिंदे, पोलीस निरीक्षक, जालना व पथकातील पोलिस अंमलदार, पोहेको/गजानन घायवट, पोहेकॉ श्रीनिवास गुडुर, पोलिस अंमलदार, गणेश चेके, गजानन कांबळे, मनोहर भूतेकर, शिवलिग खुळे, अमोल चेके लाचालुचपत प्रतिबंधक विभाग जालना यांनी केली.

# सौताडा-भूरेवाडीत बिबट्याचा दहशतवाद!

## जनावरांवरील हल्ले वाढले; शेतकऱ्यांनी सतर्क राहावे-महादेव घुले

पाटोदा । प्रतिनिधी

**सौताडा व भूरेवाडी परिसरात बिबट्याचा वावर वाढत असून गेल्या काही दिवसांत अनेक जनावरांवर हल्ल्याच्या घटना घडल्याने ग्रामीण भागात प्रचंड भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. सौताडा येथील शेतकरी राजू सानप यांच्या गोठ्यात घुसून बिबट्याने गाईवर हल्ला करत तिला ठार केले. या धक्कादायक घटनेनंतर शेतकरी भयभीत झाले असून दिवसाढवळ्या देखील शेतामध्ये जाण्यास कचरत आहेत.**

घटनेची माहिती मिळताच वन विभागाचे अधिकारी तात्काळ घटनास्थळी दाखल झाले.





पंचनामा करून पुढील कार्यवाही सुरू करण्यात आली असून शेतकरी बांधवांना रात्री उजेड ठेवण्याचे, जनावरे गोठ्यात सुरक्षित बांधून निगराणी ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

सौताडा व भूरेवाडी परिसरात बिबट्याच्या सततच्या हालचालीमुळे शेळ्या, मेंढ्या व इतर जनावरांवर हल्ल्याच्या घटना वाढल्या असल्याचे समोर येत आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण अधिकच गडद झाले आहे. या पार्श्वभूमीवर सौताडा गावचे सरपंच महादेव घुले यांनी सर्व शेतकरी बांधवांना तातडीचे आवाहन केले आहे. ''परिसरात बिबट्याचा वावर वाढला आहे. अनेक जनावरांवर हल्ले झाले आहेत. त्यामुळे आपल्या जनावरांची काळजी घ्या, सध्या काही दिवस त्यांना गोठ्यातच बांधून ठेवा व सतत लक्ष ठेवा,'' असे आवाहन सरपंच घुले यांनी केले. शेतकऱ्यांकडून परिसरात वनविभागाच्या गस्ती वाढवण्याची आणि तत्काळ उपाययोजना करण्यात यावी, अशी मागणी जोर धरत आहे.

# अंबड नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक मतदान कर्मचाऱ्यांचे पहिले प्रशिक्षण

## पुढील प्रशिक्षण २४ नोव्हेंबर व १ डिसेंबर रोजी नियोजित करण्यात आले



**अंबड । प्रतिनिधी**

यासंदर्भात १९ नोव्हेंबर रोजी तहसील कार्यालय, अंबड येथील सभागृहात मतदान केंद्राध्यक्ष व इतर मतदान अधिकारी यांचे पहिले सविस्तर प्रशिक्षण यशस्वीरित्या संपन्न झाले. या प्रशिक्षणादरम्यान निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार श्री. विजय चव्हाण यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना निवडणूक प्रक्रियेबाबत सखोल मार्गदर्शन केले. निवडणूक निर्णय अधिकारी विजय चव्हाण , सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी मनोज उकिर्डे यांनी सर्व मतदान कर्मचाऱ्यांना त्यांच्या कायदेशीर जबाबदाऱ्या आणि कर्तव्यांची जाणीव करून दिली. निवडणूक प्रक्रिया व कायदेशीर तरतुदी मतदानाच्या दिवशी पार पाडावयाच्या सर्व कायदेशीर बाबी, मतदानाची गोपनीयता आणि करावयची कार्यवाही यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. ईव्हीएम () सीलिंग व हाताळणी: मतदान यंत्रे सील करण्याची तांत्रिक पद्धत आणि त्यावेळेस घ्यावयची दक्षता यावर मार्गदर्शन केले गेले. हँड्स-ऑन ट्रेनिंग (- ): प्रत्यक्ष मतदानाच्या दिवशी कोणतीही अडचण येऊ नये म्हणून एलसीडी प्रोजेक्टरच्या माध्यमातून व्हिडिओज दाखवून आणि ईव्हीएम मशीन हाताळणीचे प्रत्यक्ष प्रशिक्षण (हँड्स-ऑन ट्रेनिंग) देण्यात आले. पुढील प्रशिक्षणाचे वेळापत्रक निवडणूक प्रक्रिया अत्यंत अचूकपणे पार पाडण्यासाठी कर्मचाऱ्यांना टप्प्याटप्प्याने प्रशिक्षित केले जात आहे. याबाबत माहिती देताना श्री. चव्हाण यांनी सांगितले की, निवडणूक कर्मचाऱ्यांचे दुसरे प्रशिक्षण दिनांक २४ नोव्हेंबर २०२५ रोजी तर तिसरे आणि अंतिम प्रशिक्षण दिनांक ०१ डिसेंबर २०२५ रोजी घेण्यात येणार आहे. या प्रशिक्षणांना सर्व नियुक्त अधिकारी व कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहणे बंधनकारक असेल. उमेदवारी मागे घेण्याची मुदत छाननीमध्ये वैध ठरलेल्या उमेदवारांना दिनांक २१ नोव्हेंबर २०२५ पर्यंत आपली उमेदवारी मागे घेता येईल. ज्यांना माघार घ्यायची आहे, त्यांनी विहित वेळेत कार्यालशी संपर्क साधावा. आचारसंहितेबाबत कडक इशारा निवडणूक कर्तव्य पार पाडताना निष्पक्ष व पारदर्शीपणाने काम करण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे. तसेच, कोणत्याही उमेदवाराकडून आचारसंहितेचा भंग होणार नाही याची दक्षता घ्यावी. अन्यथा, संबंधितांवर कठोर कायदेशीर कारवाईला सामोरे जावे लागेल, असा इशाराही देण्यात आला आहे. उपस्थित मान्यवर सदरील प्रशिक्षण माननीय जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी श्रीमती असीमा मित्तल , श्रीमती नम्रता चाटे आणि उपविभागीय दंडाधिकारी श्री. उमाकांत पारधी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले. यावेळी अंबडचे निवडणूक निर्णय अधिकारी श्री. विजय चव्हाण आणि सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा मुख्याधिकारी श्री.मनोज उकिर्डे यांची उपस्थित होते.

# पान १ वरून...

### शेतकऱ्यांच्या खात्यात

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते हा हप्ता देशातील लाखो शेतकऱ्यांच्या बँक खात्यात थेट जमा झाला आहे. ही योजना शेतकऱ्यांना निश्चित वार्षिक उत्पन्न सहाय्य मिळावे या उद्देशाने सुरू करण्यात आली आहे. योजनेनुसार पात्र शेतकरी कुटुंबांना दरवर्षी ६,००० रुपये इतकी आर्थिक मदत दिली जाते. ही मदत रु. २,००० च्या तीन समान हप्त्यांमध्ये थेट डीबीटी माध्यमातून शेतकऱ्यांच्या बँक खात्यांत जमा केली जाते.

------------

### बीडमध्ये २४१ कोटीचा

मोबाईल तपासणीत, मोबाईल मधील काही संभाषणात मागील कालावधीतील तारखा टाकून आदेश करण्यात आल्याचे वारंवार उल्लेख करण्यात आलेला आहे आणि जुन्या तारखेचे ४० लवाद आदेश आणखी होणार असल्याबाबत सुद्धा नोव्हेंबर महिन्याच्या संभाषणात उल्लेख आहे. याबाबत समिति गठित करण्यात आली, समितीच्या प्राथमिक चौकशीत आढळले की तत्कालीन जिल्हाधिकारी यांचे नाव, पदनाम व स्वाक्षरी करून मागील कालावधीत दिनांक १ मार्च २०२५ ते दिनांक १७ एप्रिल २०२५ पर्यतच्या आदेश कालावधी नमूद करून १५४ प्रकरणात बनावट आदेश निर्गमित झालेले आहेत. त्या आदेशाबाबतचा पत्रव्यवहार, संबंधित लवाद आदेशाच्या कव्हरिंग लेटरवर दिनांक १७ एप्रिल २०२५ नमूद करून संबंधित जायकवाडी प्रकल्प भूसंपादन कार्यालयाला व उपविभागीय अधिकारी बीड कार्यालयाला १ ते ५ महिन्यानंतर आदेश प्राप्त झालेला आहे. या एकूण १५४ प्रकरणात जवळपास २४१ कोटी ६२ लाख रुपये वाढीव मोबदल्याचे बनावट आदेश तयार करण्यात आल्याचे निदर्शनास आले. या प्रकरणात राष्ट्रीय महामार्ग क्रमांक २११ छत्रपती संभाजी नगर या कार्यालयाकडून अंदाजे ७३ कोटी रुपये निधी प्राप्त करून संबंधित भूसंपादन अधिकारी मार्फत वितरण झालेले असल्याने, प्रथम दर्शनी ७३ कोटी रुपयाचा अपहार झाला असल्याचे ग्राह्य धरता येईल. संबंधित आदेश पारित करताना कोणतेही रजिस्टर, कोणतीही कार्यविवरण नोंदवही बाबत माहिती भूसंपादन समन्वय कार्यालयाने ठेवलेली नाही. वर नमूद केल्याप्रमाणे एकाच दिवशी म्हणजे दिनांक १७ एप्रिल २०२५ रोजी ५० आदेश, तेही रोजनाम्यात कोणतेही पक्षकार हजर राहील्याबाबत स्वाक्षरी न होता झालेले आहेत. सदर बाब ही निश्चितच संशयास्पद आढळली आहे.

-------------

### बीडचे दोन्ही शिक्षणाधिकारी

वरिष्ठांचे नसताना शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी भरण्याची परवानगी संबंधित संस्थांना देऊन करोडो रुपयाची माया जमा केली. यासोबतच प्राथमिक विभागाचे शिक्षणाधिकारी भगवान फुलारी यांनी देखील अनेक शाळांना मान्यता दिल्याच्या तक्रारी करण्यात आल्या होत्या. शिक्षण विभागांमध्ये कोट्यावधी रुपयांचा भ्रष्टाचार शिक्षणाधिकाऱ्यांनी केला असल्याची तक्रार सामाजिक कार्यकर्ते सादिक इनामदार यांनी जिल्हाधिकारी महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण विभागाकडे आणि शिक्षण संचालकाकडे केल्यानंतर या प्रकरणाची एसआयटी चौकशी लावण्यात आली होती, असे असताना माध्यमिकचे शिक्षण अधिकारी शिंदे यांची बदली करण्यात आली. मात्र आता याच प्रकरणात शिक्षणाधिकारी नागनाथ शिंदे व भगवान फुलारी या दोघांनाही शासकीय सेवेतून निलंबित करण्याचे आदेश प्रधान सचिव आणि दिले आहेत. या कार्यकाळामध्ये प्राथमिक शिक्षणाधिकारी फुलारी यांचे मुख्यालय बीड तर माध्यमिक शिक्षणाधिकारी नागनाथ जाधव यांचे मुख्यालय लातूर येथे ठेवण्यात आले आहे. या दरम्यान ते वरिष्ठांची परवानगी घेतल्याशिवाय मुख्यालय न सोडण्याचे आदेशात नमूद केले आहे. दोन्ही शिक्षण अधिकारी एकाच वेळी निलंबित करण्यात आल्याने शिक्षण विभागात एकच खळबळ उडाली आहे.

**इतर अनेकांना घरी बसावे लागणार**

माध्यमिक शिक्षणाधिकारी नागनाथ जाधव यांनी त्यांच्या कार्यकाळामध्ये मान्यता नसतानाही दिलेल्या तुकड्या यासोबतच जुन्या नियुक्त्या दाखवून कायम केलेले शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी याची सर्व फाईल आता पुन्हा नव्याने उघडली जाणार असून आता अशा अनेक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना घरी बसावे लागणार आहे.

---------

### निवडणूक आरक्षणावर

स्वराज्य संस्थामध्ये ओलांडली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी इतर मागास प्रवर्गासाठी (ओबीसी) सरसकट २७ टक्के आरक्षण लागू करण्या निर्णया करण्याच्या राज्य सरकारच्या निर्णयावर सर्वोच्च न्यायालयात न्या.सूर्यकांत आणि न्या. जॉयमाल्या बागची यांच्या खंडपीठाने नापसंती व्यक्त केली होती. राज्य निवडणूक आयोगाने नगरपालिका, नगरपंचायत निवडणुकीसाठीआरक्षण सोडतीबाबत स्पष्ट सूचना दिल्या असताना काही ठिकाणी ५० टक्यांपेक्षा अधिक आरक्षणामुळे गोंधळाची स्थिती निर्माण झाली आहे. आदिवासीबहुल स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आरक्षणाचा प्रश्न निर्माण झाला आहे. नंदूरबार जिल्हा परिषदेमध्ये आरक्षण १०० टक्के झाले आहे. पालघरमध्ये ९३ टक्के, गडचिरोली ७८ टक्के, धुळे ७३ टक्के, नाशिक ७२ टक्के आरक्षण लागू झाले आहे. अमरावती, चंद्रपूर, यवतमाळ, अकोला जिल्हा परिषदांमध्ये ६० ते ७० टक्के दरम्यान आरक्षण लागू झाले आले आहे. नागपूर, ठाणे, वाशिम,नांदेड, जळगाव, हिंगोली, वर्धा आणि बुलढाणा या आठ जिल्हा परिषदांमध्ये ५१ ते ६० टक्के दरम्यान आरक्षण देण्यात आले आहे.

--------

### भारताला हिंदू राष्ट्र घोषित करणे

होण्यासाठी भारताला कोणत्याही अधिकृत घोषणेची आवश्यकता नाही. त्याचे सभ्यता स्वरूप आधीच हे प्रतिबिंबित करते.''असे म्हटले आहे. मोहन भागवत यांनी सांगितले की, आरएसएसची स्थापना कोणाचाही विरोध करण्यासाठी किंवा नुकसान करण्यासाठी नाही, तर चारित्र्य निर्मितीवर लक्ष केंद्रित करण्यासाठी आणि भारताला जागतिक नेता बनवण्यासाठी योगदान देण्यासाठी झाली आहे. असे आहे. ते म्हणाले, ''विविधतेमध्ये भारताला एकत्र आणण्याची पद्धत म्हणजे आरएसएस.

-----------

### उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

शिंदेंना देण्यात आले होते. पण शिंदे या कार्यक्रमाला अनुपस्थित राहतील, अशी माहिती शिंदे यांच्या नगरविकास विभागाकडून देण्यात आली. या कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवारांची उपस्थिती होती. शिंदे यांच्या अनुपस्थितीची बरीचशी राजकिय चर्चा झाली. गेल्या काही दिवसांतील घडामोडी पाहता, शिंदे यांची गैरहजेरी चर्चेचा विषय ठरली. दिल्लीला रवाना झालेले शिंदे गुरूवारी बिहारला जाणार आहेत. पाटण्यात एनडीए सरकारचा शपथविधी सोहळा संपन्न होणार आहे. आपण एनडीएसोबत भक्कमपणे असल्याचा संदेश पाटणा दौऱ्यातून शिंदे देतील, अशी आशा राजकिय वर्तुळातून व्यक्त होत आहे. एकनाथ शिंदे यांचा बालेकिल्ला असलेल्या कल्याण-डोंबिवलीत मोठ्या प्रमाणात शिंदे समर्थक नगरसेवक आणि कार्यकर्त्यांना भाजपमध्ये प्रवेश दिल्याने वादाची ठिणगी पडली आहे. या पार्श्वभूमीवर शिंदे यांची मुख्यमंत्री फडणवीस यांच्यात बैठक झाली होती. सध्याच्या फोडाफोडीच्या राजकाणावरुन शिवसेनेत प्रचंड नाराजी आहे. स्थानिक पातळीवर पक्ष कमकुवत होत असल्याने शिवसेना सतर्क झाली आहे. मंगळवारी ही नाराजी पाहायला मिळाली. शिवसेनेच्या मंत्र्यांनी मंत्रिमंडळ मंत्रिमंडळ बैठकीवर बहिष्कार टाकला होता. केवळ शिंदे मंत्रिमंडळ बैठकीला उपस्थित राहिले होते. तसेच शिंदे आणि त्यांचे मंत्री मुख्यमंत्र्यांकडे तक्रारही घेऊनही गेले होते. शिवसेना नेते आणि नगरसेवकांना मोठ्या प्रमाणात भाजपमध्ये प्रवेश दिला जात असल्याबद्दल शिवसेनेच्या मंत्र्यांनी मुख्यमंत्र्यांसमोर नाराजी व्यक्त केल्याचे सुत्रांकडून सांगण्यात आले. दरम्यान, मुख्यमंत्र्यांनी शिंदे यांच्यासमोर शिवसेनेच्या मंत्र्यांना झापल्याची माहिती समोर आली आहे. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी, तुमच्या गटाकडून कसे प्रवेश दिले जात आहेत? याची यादीच वाचून दाखवली.

-------------

### वॉट्स अॅपचा डेटा लीक

स्क्रिप्टचा वापर करून कोट्यवधी फोन नंबर्सची चाचणी केली. तांत्रिक भाषेत, याला ''कॉन्टॅक्ट डिस्कव्हरी फ्लॉ'' म्हणतात. विशेष म्हणजे, या चाचणीत व्हॉट्सअॅपच्या या त्रुटीचा फायदा घेऊन, ते वापरकर्त्यांचा प्रोफाइल फोटो, अॅक्टिव्ह स्टेटस आणि महत्त्वाचे म्हणजे तो नंबर खरा आणि वापरात आहे का, याची खात्री करू शकले. महत्त्वाची गोष्ट म्हणजे हा डेटा कोणत्याही सर्व्हरला हॅक करून चोरलेला नाही, तर सिस्टीममधील त्रुटीचा गैरफायदा घेऊन काढला गेला आहे. एकाच खोलीत बसून, कोणीही तुमच्या माहितीशिवाय जगातील कोठूनही मोबाइल नंबरची यादी तयार करू शकते. नंतर ते डार्क वेबवर विकले जाते आणि सायबर गुन्हेगार त्याचा गैरफायदा घेतात. या घटनेने पुन्हा एकदा मेटा आणि डेटा गोपनीयतेच्या प्रश्नावर प्रश्नचिन्ह उभे केले आहे. धक्कादायक बाब म्हणजे, संशोधकांनी ही त्रुटी २०१७ मध्येच कंपनीच्या निदर्शनास आणून दिली होती. केंब्रिज अॅनालिटिका डेटा ब्रीच सारख्या मोठ्या घटनांनंतरही कंपनीने ही समस्या गांभीऱ्याने घेतली नाही.

-----------

### पोलिस संरक्षणास

यापूर्वी जरांगे यांनी आमदार धनंजय मुंडे यांच्यावर आपला घातपात करण्याचा कट रचल्याचा गंभीर आरोप केला होता. या आरोपांवर जरांगे अजूनही ठाम आहेत. दरम्यान, पोलिस अधीक्षकांना दिलेल्या अर्जात मनोज जरांगे पाटील यांनी अत्यंत गंभीर आरोप केला आहे. माझ्या घातपाताचा कट रचणारा धनंजय मुंडेच आहे. या कटाच्या मुख्य सूत्रधाराला सरकार चौकशीपासून आणि अटकेपासून वाचवत आहे. असा आरोप त्यांनी केला आहे.

दैनिक

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

गुरुवार दि. २० नोव्हेंबर २०२५



## थोडक्यात



### राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय एकता दिनानिमित्ताने अभिवादन

किल्ले धारूर । प्रतिनिधी

येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय एकता दिनानिमित्ताने पहिल्या महिला पंतप्रधान स्वर्गीय इंदिरा गांधी यांच्या जयंती निमित्ताने प्रतिमेस गणित विभागातील प्राध्यापक डॉ. अनंथा गाडे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे, उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे, उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड, पर्यवेक्षक प्रा. सच्चिदानंद ढेपे, प्रोफेसर डॉ. अशोक लाखे, सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. विनायक कापावार, डॉ. नितीन कुंभार, प्रा. नागोराव वाघमारे, डॉ. अनंथा गाडे, डॉ. विजयकुमार कुंभारे, प्रा. निलेश शिंदे, प्रा. लक्ष्मण वैरागे, अशोक जगताप, जितेंद्र पवार, डि. के. सोळंके, श्री. भोसले यांबरोबर प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थ्यांची उपस्थिती मोठ्या संख्येने होती.

### माजलगाव तालुकाध्यक्षपदी दत्ता कांबळे

माजलगाव । प्रतिनिधी

येथील काँग्रेसचे चळवळीतील कार्यकर्ते दत्ता लक्ष्मण कांबळे यांची काँग्रेसचे महाराष्ट्? प्रदेश कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या आदेशाने माजलगाव तालुका काँग्रेसच्या प्रभारी अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.



भाजप शासनाच्या जातीय व धार्मिक तेढ निर्माण करणा-या धोरणावर तसेच सर्वसामान्य जनतेला भेडसावणा-या महागाई आणि भ्रष्टाचार या सारख्या गंभिर विषयावर जागरूकता निर्माण करण्यासाठी दिवसरात्र झटत धर्मनिरपेक्ष आणि सर्व समावेशक विकास देणारे काँग्रेस सरकार राज्यात व देशात आणण्यासाठी मेहनत घेण्यासाठी आणि पक्षाला बळकटी देण्यासाठी प्रयत्नशील असलेल्या दत्ता कांबळे यांची काँग्रेसच्या माजलगाव तालुकाध्यक्ष प्रभारीपदी अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष मल्लीकार्जुन खर्गे, देशाच्या नेत्या सोनिया गांधी, विरोधी पक्षनेते खा. राहुल गांधी, महाराष्ट्? प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, रमेश चेन्नीथला, खा. रजनी पाटील, मा. मंत्री अशोकराव पाटील, आदित्य पाटील, जिल्हा प्रभारी धिरज देशमुख, जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे पाटील यांनी निवड केली असुन त्यांच्या निवडीचे सर्व स्तरातुन अभिनंदन होत आहे.

### अनेक शेतकरी अनुदानापासून वंचित

बीड । प्रतिनिधी

गेल्या दोन-तीन महिन्यांत महाराष्ट्रासह बीड जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी झाली, यात शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले, सरकारने शेतकऱ्याना मदत जाहीर केली, शेतकऱ्यांची दिवाळी गोड करू असे म्हणणाऱ्या सरकारने दिवाळीत तर मदत केली नाही, दिवाळीनंतर जी मदत मिळाली तीही तुटपुंजी मिळाली, अनेक शेतकऱ्यांना फार्मर आयडी काढला नसल्याच्या नावाखाली आणि अनेकांना केवायसी नसल्याचे कारण सांगून मदत मिळाली नाही, गेल्या काही दिवसांपासून शेतकऱ्यांच्या खात्यावर रक्कम टाकणे चालू आहे असे सांगितले जात आहे मात्र प्रत्यक्षात आजही शेतकऱ्यांना मदत मिळाली नाही, ही मदत सरकार कधी देणार? असा सवाल सर्वसामान्य शेतकऱ्यांकडून केला जात आहे.

## नागझरी शिवारात अवैध वाळू घेऊन जाणारा ट्रक पकडला

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील नागझरी शिवारात वाळू साठा करून ठेवलेली वाळू ट्रक मध्ये घेऊन जाताना गेवराई पोलिसांनी ताब्यात घेतले. मात्र ट्रक मध्ये वाळू भरणारा ट्रॅक्टर आणि चालक पोलिसांना पाहताच पसार झाले.

पोलीस अधिक्षक नवनीत कॉंवत यांनी जिल्ह्यामध्ये अवैध धंद्यावर कारवाई करण्याबाबत वारंवार जिल्ह्यातील सर्व पोलीस अधिकारी अंमलदार यांना कडक सुचना दिल्या होत्या. त्याच अनुशंगाने पोलीस स्टेशन गेवराई परीसरात अवैध धंद्यांवर कारवाई करणेकामी पोलीस स्टेशन गेवराईचे पथक गोदावरी नदीपात्राचे जवळील परीसरात अवैध वाळु वाहतुकीवर कारवाईसाठी रवाना झाले असता गोपनिय माहिती मिळाली की, जुन्या



गेवराई पोलिसांची कारवाई

नागझरी शेतशिवारामध्ये धुळे सोलापुर नॅशनल हायवेवरील नाथसागर हॉटेलच्या बाजुने जुन्या नागझरी गावाकडे जाणा-या डांबरी रोडवर जुन्या नागझरी शेतशिवारातील पाण्याच्या टाकीचे जवळ एका मालवाहु ट्रकमध्ये गोदावरी नदीपात्रातुन चोरुन काढलेली वाळु भरत आहेत अशी खात्रीशीर माहिती मिळाल्याने गेवराई पोलीस पथकाचे अधिकारी अंमलदार यांनी सदर ठिकाणी पोहचुन रेड केली असता सदर ठिकाणी अवैधरित्या एक मालवाहु ट्रक रस्त्यावर आडवा उभा असल्याचे व त्यामध्ये एक ईसम ट्रॅक्टर लोडरचे सहाय्याने तिथेच पडुन असलेली काळ्या रंगाची ओली वाळु भरत असल्याचे त्यांना दिसुन आले. पोलीस आल्याची चाहुल लागताच ट्रॅक्टर लोडरवर चालक असलेला ईसम सुनिल माळी रा, गोपाळ वस्ती, बेलगाव हा त्याचे ताब्यातील लाल रंगाचे ट्रॅक्टर लोडर घेवुन तेथुन लोडरसह पसार झाला. त्यानंतर त्याठिकाणी उपस्थित चालक मनोज रेणुकादास जोगदंड, वय-३६ वर्षे, रा-शहागड, ता-अंबड, जि-जालना याचे ताब्यातुन पोलीसांनी एक अशोक लेलँड कंपनीचा लाल रंगाचा मालवाहु ट्रक किंमत अंदाजे २९,००,०००/-रु त्याचेमध्ये असलेली वाळु किंमत १२,०००/- रु असा एकुण २९,१२,०००/-/- रु चा मुद्देमाल जप्त केला असुन पोलीस स्टेशन गेवराई येथे आरोपी सुनिल माळी, रा-गोपाळ वस्ती, बेलगाव, ता-गेवराई, जि-बीड व मालवाहु ट्रकचालक मनोज रेणुकादास जोगदंड, वय-३६ वर्षे, रा-शहागड, ता-अंबड, जि-जालना याचेविरुध्द विविध कलमान्वये गुन्हा दाखल केलेला आहे.

सदरची कारवाई पोलीस अधिक्षक नवनीत कॉंवत, अपर पोलीस अधिक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल कटके, उपविभाग गेवराई मा, पोलीस निरीक्षक किशोर पवार यांचे मार्गदर्शनामध्ये सपोनि संतोष जंजाळ, पोलीस उपनिरीक्षक प्रदिप आढाव, राम खोत, पोशि गोरक्ष डोके पोलीस स्टेशन गेवराई यांनी केली.

## अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या दोन वाहनावर दिंद्रुड पोलिसांची कारवाई,अडीच ब्रास वाळू जप्त

**बीड । प्रतिनिधी**

परिसरामध्ये अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या दोन वाहनावर दिंद्रुड पोलिसांनी कारवाई करून वाळूसह वाहने जप्त करण्यात आली ही कारवाई दिंद्रुड पोलिसांनी केली.

दि. १८/११/२०२५ रोजी दिंद्रुड पोलीस स्टेशन हद्दीत वाळूची विनापरवाना चोरटी वाहतूक करणाऱ्या दोन वाहनांवर यशस्वी कारवाई करून एकूण अडीच ब्रास वाळू आणि दोन वाहने असा मिळून १२,१५,०००/- किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तसेच दोन्ही घटनांमध्ये स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

पहिल्या घटनेत दिनांक १८/११/२०२५ रोजी २१.१५ वा. हॉटेल बप्पाश्री जवळ, आनंदगाव ते लोनगाव रोड वर पांढऱ्या रंगाचे क्रमांक नसलेले पिकअप वाहनात आरोपी जितीन राजेभाऊ पौळ, वय ३२ वर्षे, रा. खरात आडगाव हा एक ब्रास वाळू किंमत ६,०००/- ची अवैधरित्या वाहतूक करतांना मिळून आल्याने त्याच्या ताब्यातील पिकअप वाहन - ४,००,०००/- व एक



ब्रास वाळू असा एकूण - ४,०६,०००/- चा मुद्देमाल जप्त करुन त्याच्याविरुद्ध पोलीस स्टेशन दिंद्रुड येथे गु.र.नं. २९४/२०२५ कलम ३०३(२) इछड प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर दुसर्या घटनेत दिनांक १८/११/२०२५ रोजी २२.१५ वा. लोनगाव चौकाजवळ, आनंदगाव ते लोनगाव रोड वर आरोपी जीवन काशिनाथ साळवे, वय ३० वर्षे, रा. खरात आडगाव, ता. माजलगाव हा त्याच्या ताब्यातील वाहन क्रमांक ४०७ टेम्पो क्र. चक २१ द ०३५३ मध्ये अवैधरीत्या दीड ब्रास वाळू किंमत - ९,०००/- वाहतूक करतांना मिळून आल्याने त्याच्या ताब्यातील टेम्पो वाहन किंमत - ८,००,०००/- व दिड ब्रास वाळू असा एकूण - ८,०९,०००/- चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपीविरुद्ध पोलीस स्टेशन दिंद्रुड येथे गु.र.नं.: २९५/२०२५ कलम: ३०३(२) इछड प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉंवत, अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके, उपविभागीय पोलीस अधिकारी शैलेश गायकवाड, यांच्या मार्गदर्शनात सपोनि. महादेव ढाकणे, पोउपनि. पवनसिंग जंघाळे,पोह/१७६ भराडे,पोशि/३६० सचिन गायकवाड यांनी केली आहे.

## पान ६ वरुन...

### शहराच्या विकासासाठी

ते यावेळी म्हणाले. तर बहुजन विकास मोर्चा मोहन जगताप सहाल चाऊस यांना सोबत घेऊन आ.प्रकाश सोळंके यांना नगरपरिषद निवडणुकीत हद्दपार करणार आहे. ही लढत टक्केवारी खाऊन गलेलठ्ठ होणाऱ्या आमदार सोळंकेला धडा शिकवणारी असेल असे बहुजन नेते बाबुराव पोटभरे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. या पत्रकार परिषदेला माजलगाव विधानसभा अध्यक्ष नारायण डक, कचरू खळगे,श्रीहरी मोरे, विश्वंभर थावरे, सहाल चाऊस, श्रीकृष्ण सोळंके, शकील कुरेशी, प्रभाकर नरवडे, विवेक पोटभरे, शरद यादव, इत्यादी उपस्थित होते. यावेळी प्रभाग क्रमांक १ मध्ये दळवी जया,शरद यादव प्रभाग २ जावळे उज्वला, तालेब चाऊस, प्रभाग ३ सय्यद आली नूर, शेख नाजमीन, प्रभाग ४ मेंडके किशोर, मेंडके कांताबाई, प्रभाग ५ सुचिता होके, चंद्रकांत देशमुख, प्रभाग ६ गंगाबाई भोसले, लतीफ सय्यद हुर, प्रभाग ७ शिंदे संध्या, शंकर शेंडगे, प्रभाग ८ सहाल चाऊस, शेख नूरजहाँ प्रभाग ९ महेमुद कुरेशी, सीमा होके, प्रभाग १० नीला इतापे, इम्रान खान, प्रभाग ११ सुलताना कुरेशी, अजिंक्य डक, प्रभाग १२ लता वाघमारे, सय्यद तौफिक, प्रभाग १३ उषा अशोक लांडगे, सय्यद अफसाना सलीम यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

### सौताडा परिसरात

असून वन विभागाने याची तात्काळ दखल घेऊन या भागामध्ये पिंजरा लावावा अशी मागणी होत आहे. पूर्वी दोन ठिकाणी शेळ्या खाल्ल्यानंतर या भागाचे आ. सुरेश धस यांनी वन विभागाच्या अधिकाऱ्यांना या संदर्भात कळवून याचा लवकर बंदोबस्त करा. अशा सूचना दिल्या होत्या. मात्र या सूचनाकडे दुर्लक्ष झाल्याने आता सौताडा येथे सोमवारी तिसरा गाईचा बळी गेला. हे प्रकार दिवसेंदिवस वाढत असल्याने परिसरामध्ये दहशत पसरली असून वनविभागाने तात्काळ दाखल घेऊन पिंजरा लावावा अशी मागणी परिसरातील नागरिक करत आहेत .

### हमारा शौचालय हमारा

यांची नोंद घेऊन त्यांची दुरुस्ती करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले आहे. या कालावधीत शाळा, ग्रामसभा, स्वयंसहाय्य गट, युवक मंडळे, निवृत्त सैनिक, सामाजिक कार्यकर्ते यांचा सहभाग घेऊन स्वच्छता, आरोग्य, सुरक्षित मलनिस्सारण तसेच हवामान अनुकूल स्वच्छतेबाबत जनजागृती केली जाणार आहे. ग्रामस्थांना त्यांच्या वैयक्तिक व सार्वजनिक शौचालयांची रंगरंगोटी, सुशोभीकरण आणि नियमित देखभाल करण्यासाठी प्रोत्साहित केले जाईल. २१ नोव्हेंबर ते ५ डिसेंबर या कालावधीत गावागावांत मोहिमेचे विविध उपक्रम राबविण्यात येतील. उत्तम देखभाल व सुशोभीकरण करणाऱ्या वैयक्तिक शौचालये व सामुदायिक शौचालये यांना अंतिम टप्प्यात विशेष गौरव करण्यात येणार आहे. १० डिसेंबर रोजी मोहिमेचा समारोप करून उत्कृष्ट शौचालय पुरस्कार जाहीर केले जातील. तरी या मोहिमेत सर्व ग्रामस्थांनी सहभागी व्हावे, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांनी केले आहे.

### नगराध्यक्षपदाचे उमेदवार

केल्या जात आहेत. उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत संपल्यानंतर मंगळवार दि १८ रोजी अर्ज पडताळणीची प्रक्रिया पार पडली.यामध्ये राजकिशोर मोदी यांनी दाखल केलेल्या उमेदवारी अर्जात क्रमांक पाचच्या रकान्यात जातीचा उल्लेख केल्याचा किरकोळ व तोंडी आक्षेप प्रतिस्पर्धी उमेदवार नंदकिशोर मुंदडा यांनी घेतला. पण अंबाजोगाई नगर परिषदेचे नगराध्यक्ष पद सर्वसाधारण प्रवर्गासाठी असल्याने दाखल केलेल्या अर्जात जातीचा उल्लेख केला किंवा नाही केला तरी फरक पडत नाही असे निवडणुक निर्णय अधिकारी तथा उप जिल्हाधिकारी दीपक वजाळे यांनी स्पष्ट करत मुंदडा यांनी घेतलेला आक्षेप साफ फेटाळून लावला. याउपर सुद्धा आक्षेप घ्यायचा असेलच तर लेखी स्वरूपात आपला आक्षेप घ्यावा असे निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी सांगितले. पण आक्षेप घेण्याची मुदत संपेपर्यंत विरोधकांकडून कसलाच लेखी आक्षेप आला नाही. याबाबत आमच्या प्रतिनिधींशी बोलताना राजकिशोर मोदी यांनी विरोधकांनी रडीचा डाव न खेळता नैतिक मार्गांचा अवलंब करून निवडणूक लढवावी असे आवाहन त्यांनी केले. आजपर्यंत त्यांनी माझ्यावर अनेक बिनबुडाचे आरोप केले, पण एकसुद्धा आरोप ते सिद्ध करू शकले नसल्याचे मोदी यांनी सांगितले. विरोधकांच्या दडपशाहीला , आर्थिक आमिषाला आणि खोट्या प्रचाराला अंबाजोगाई ची सुजाण जनता बळी पडणार नाही हे निकालातुनच दिसून येईल. असा ठाम विश्वास देखील राजकिशोर मोदी यांनी यावेळी बोलून दाखवला.

### स्वस्तात विमानाची तिकिटे

महेश जाधव, गहिनाथ बावनकर, राम पवार यांचा विशेष सहभाग होता.

**पोलीसांचे आवाहन :** सर्वसामान्य नागरिकांनी स्वस्तात विमानाची तिकीट मिळेल, परदेशात नोकरी लावून देतो, मोठा माल स्वस्तात देतो अशा कोणत्याही आमिषावर विश्वास ठेवू नये.मोठी रक्कम देताना खात्री करूनच व्यवहार करावा.फसवणूक संशयित वाटल्यास त्वरित पोलिसांशी संपर्क साधावा.

### शिवरायांचा मुस्लिम मावळा

राज्यस्तरीय मौलाना अब्दुल कलाम आझाद समाजसेवा पुरस्कार व २०२२/२३ यशवंत रत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. समाजात हिंदू-मुस्लिम ऐक्य आणि सलोखा टिकवण्यासाठी शेख यांनी केलेल्या प्रयत्नांची आजवर विविध स्तरावर दखल घेण्यात आली. सामाजिक क्षेत्रातील त्यांचे योगदान, पत्रकारितेत मानले जाणारे प्रश्न आणि जनतेशी असलेला दैनंदिन संवाद यामुळेच त्यांना राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार प्राप्त झाल्याचे आयोजकांनी सांगितले आहे. या सोहळ्याला ज्येष्ठ पत्रकार उत्तमराव बोडखे, ग्रामविस्तार अधिकारी बाळासाहेब थोरवे, सरपंच दत्तात्रय खोटे, सरपंच परिवंत गायकवाड, सरपंच अजित घुले, मुख्याध्यापक साईनाथ बोडखे, वाल्हेकर, विष्णू नन्नवरे, सरपंच विठ्ठल राख, आनंद देवा, राजेंद्र बोराडे, प्रविण खाडे, अध्यक्ष महेश भगत, बाबासाहेब भोसले, पत्रकार मारुती सत्रे, महेश खिलारे, उमेश सुरवसे, अर्जुन थोरात, अशोक गर्जे आदी मान्यवर उपस्थित होते. समाजसेवक समीर शेख यांना सर्व स्तरावरून कौतुक व शुभेच्छा यांचा वर्षाव होत आहे.

## धामणगाव केंद्रीय प्राथमिक शाळेच्या विद्यार्थिनींची स्काऊट गाईड राष्ट्रीय जांभोरी निवड

आष्टी । प्रतिनिधी

उत्तर प्रदेश मधील लखनऊ येथे होणार १९ राष्ट्रीय जांभोरी आष्टी तालुक्यातील केंद्रीय प्राथमिक शाळा धामणगाव येथील नऊ गाईड विद्यार्थिनी व दोन स्काऊट गाईड यांची लखनऊ येथे होणाऱ्या ग्रँड फिनाले डायमंड जुबिली जांभोरी आणि एकोणिसावी राष्ट्रीय जांभोरी लखनऊ उत्तर प्रदेश या ठिकाणी निवड झाली आहे..



लखनऊ उत्तर प्रदेश येथे दिनांक २३ नोव्हेंबर २०२५ ते २९ नोव्हेंबर २०२५ या कालावधीमध्ये होणाऱ्या राष्ट्रीय जांभोरी साठी धामणगाव येथील केंद्रीय प्राथमिक शाळेतील गायडर शिक्षिका श्रीमती पुष्पा झिंजुरके मॅडम व स्काऊट मास्टर प्रमोद धुर्वे यांच्या मार्गदर्शनामध्ये गाईड विद्यार्थिनी समृद्धी लोखंडे , कृष्णा लोखंडे, समृद्धी महाजन ,श्रावणी चौधरी समृद्धी पी लोखंडे, समृद्धी डी लोखंडे, सानिका झिंजुर्के, राजनंदिनी लोखंडे ,परी झिंजूर्के तनुजा चौधरी या विद्यार्थिनींना शिक्षणाधिकारी माध्यमिक तथा जिल्हा आयुक्त गाईड श्रीमती पाटील मॅडम , शिक्षणाधिकारी प्राथमिक तथा जिल्हा आयुक्त स्काऊट भगवान फुलारी यांचे आदेशाने गाईडची टीम लखनऊच्या दिशेने रवाना झाली . निवड झालेल्या टीमचे आष्टी पाटोदा शिरूर चे आमदार सुरेश आण्णा धस , माजी आमदार साहेबराव दरेकर नाना, माजी आमदार भीमराव धोंडे साहेब, माजी आमदार बाळासाहेब आजाबे काका , गटशिक्षणाधिकारी. श्रीमती सीमा काळे मॅडम केंद्रप्रमुख आम्रपाली सावंत मॅडम केंद्रीय मुख्याध्यापक हिरामण थोरवे सर , धामणगावचे सरपंच संजना ताई गाढवे , शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष उपाध्यक्ष शिक्षण प्रेमी नागरिक व समस्त ग्रामस्थ यांनी जांभोरी साठी निवड झालेल्या मुलींचे आणि शिक्षकाचे विशेष अभिनंदन करून पुढील प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## प्रा. डॉ. लक्ष्मण उलगडे परिवाराच्या वतीने श्रीगुरुमाऊली व पदाधिकाऱ्यांचा सत्कार

बीड । प्रतिनिधी

नांदेड जिल्ह्यातील देगलूर येथील सिद्धेश्वर मंगल कार्यालयात १६ नोव्हेंबर २०२५ रोजी प्रा. डॉ. लक्ष्मण उलगडे परिवाराच्या वतीने आयोजित कार्यक्रमात तमलूर मठाचे मठाधिपती आदरणीय ष.ब्र. १०८ श्री शिवानंद शिवाचार्य महास्वामी तमलुरेश्वर यांचा भव्य सत्कार करण्यात आला.



यावेळी डॉ. लक्ष्मण उलगडे यांचा आशिर्वादरूपी सत्कार स्वामीजींच्या हस्ते संपन्न झाला. तसेच गेल्या २४ वर्षांपासून सुरू असलेल्या तमलूर-मदनूर ते श्रीक्षेत्र कपिलाधार महापदयात्रेत कार्यरत पंचवीस पदाधिकाऱ्यांचा गौरव करण्यात आला. नव्या तीन पायाचा घोडा चित्रपटातील कलाकार अक्षय मांडे यांचाही डॉ. उलगडे यांच्या हस्ते सत्कार झाला.कार्यक्रमात उलगडे लिखित लोकप्रशासन संकल्पना व तत्वे कोश या ग्रंथाचे प्रकाशन श्रीगुरुमाऊली यांच्या हस्ते करण्यात आले. आशिर्वचनात त्यांनी सांगितले की, सेवा ही भावना मनातून परिश्रमपूर्वक असावी. पदयात्रेत भोजन, सुरक्षा, आरोग्य व निवासासाठी कार्यरत पदाधिकाऱ्यांचा सन्मान आवश्यक. उलगडे परिवाराने त्या भावनेने प्रीतीभोजाची उत्तम व्यवस्था केली, ही स्तुत्य बाब आहे.

डॉ. उलगडे यांच्या कार्याचे कौतुक करताना त्यांनी म्हटले, मूर्ती लहान पण कीर्ती महान अथक परिश्रमातून त्यांनी मिळविलेले यश प्रेरणादायी आहे.

प्रास्ताविक पदयात्रा सचिव संतोष मांडे यांनी केले, तर मनोगत डॉ. उलगडे यांनी व्यक्त केले. आभार महापदयात्रेचे उपाध्यक्ष जीवन पाटील यांनी मानले.या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी अध्यक्ष लक्ष्मण पाटील बिरादार, प्रभय्या स्वामी, कांतू महाराज, तेजेराव टेकमाळे, शिवा बन्नालिकर, आकाश गुडपळे, बापू डाकनवाले तसेच उलगडे परिवार यांनी परिश्रम घेतले.

## खेळातून येणारी शिस्त आणि आत्मविश्वास आयुष्यभर साथ देतो - नयन बारगजे

### सिंदफणा पब्लिक स्कूलचा वार्षिक क्रीडा महोत्सव मोठ्या उत्साहात संपन्न

माजलगाव । प्रतिनिधी

खेळातून येणारी शिस्त आणि आत्मविश्वास आयुष्यभर साथ देतो. प्रत्येक विद्यार्थ्याने खेळाला केवळ स्पर्धा म्हणून नव्हे, तर आत्मविकासाचे साधन म्हणून स्वीकारले पाहिजे, असे प्रेरणादायी विचार राष्ट्रीय तायक्वांदो खेळाडू नयन बारगजे यांनी सोमवार, दिनांक १७ नोव्हेंबर रोजी सिंदफणा पब्लिक स्कूल, पिंपळगाव येथे आयोजित वार्षिक क्रीडा महोत्सव २०२५ च्या उद्घाटन समारंभात व्यक्त केले.

विद्याभुवन शिक्षण प्रसारक मंडळ संचलित या शाळेत शाळेच्या सचिव मंगलाताई सोळंके आणि समुपदेशक नीलाताई देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन राष्ट्रीय तायक्वांदो प्रशिक्षक डॉ. अविनाश बारगजे आणि राष्ट्रीय तायक्वांदो खेळाडू नयन बारगजे यांच्या प्रमुख उपस्थितीत मोठ्या जोशात आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडला. इयत्ता पहिली ते पाचवी तसेच सहावी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित या महोत्सवात विविध स्पर्धांचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. उद्घाटन समारंभाची सुरुवात शाळेच्या संगीत विभागाच्या वतीने सादर केलेल्या सुरेल स्वागत गीताने मंगलमय वातावरणात झाली. या वेळी क्रीडा ध्वजारोहण उपस्थित सर्व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर इयत्ता दहावी वर्गातील राष्ट्रीय बॉलीबॉल खेळाडू स्नेहल शिंदे हिने सर्व




खेळाडूंना क्रीडा शपथ दिली. शाळेच्या राष्ट्रीय शालेय क्रिकेट स्पर्धेत निवडल्या गेलेल्या तीन मुलींनी धगधगती प्रज्वलित मशाल आणून प्रमुख पाहुणे आणि उपस्थित सर्व मान्यवरांच्या वतीने दीप प्रज्वलन करण्यात आले, ज्यामुळे कार्यक्रमाला एक विशेष वैशिष्ट्य प्राप्त झाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक क्रीडा शिक्षक पुरुषोत्तम सोळंके यांनी आपल्या केले. प्रमुख पाहुणे डॉ. अविनाश बारगजे यांनी आपल्या प्रेरणादायी भाषणात विद्यार्थ्यांशी संवाद साधताना सांगितले की, खेळातून शिस्त, सहानुभूती, निर्णयक्षमता, नेतृत्वगुण, सहकार्याची भावना आणि सकारात्मक दृष्टिकोन निर्माण होतो. या गुणांच्या बळावर विद्यार्थी कोणत्याही क्षेत्रात यशस्वी होऊ शकतात. त्यांच्या या विचारांनी विद्यार्थ्यांमध्ये नवीन उत्साह आणि प्रेरणा निर्माण झाली.अध्यक्षीय भाषणात बोलताना शाळेचे प्राचार्य अन्वर शेख यांनी गेल्या वर्षभरात क्रीडा विभागाने मिळवलेल्या उल्लेखनीय यशाचा आढावा सादर केला. त्यांनी विद्यार्थ्यांना खेळाच्या माध्यमातून सर्वांगीण विकास साधण्याचे आवाहन केले आणि शाळेच्या क्रीडा उपक्रमांची विशेष माहिती दिली.शाळेच्या क्रीडांगणात विविध वयोगटातील विद्यार्थ्यांच्या रंगतदार आणि कौशल्यपूर्ण स्पर्धा पार पडल्या. विद्यार्थ्यांनी प्रचंड उत्साह, स्पर्धात्मकता आणि प्रामाणिक खेळाडूवृत्ती दाखवत आपले कौशल्य सादर केले. संपूर्ण दिवसभर चाललेल्या या स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी विविध खेळांमध्ये भाग घेत आपली प्रतिभा दाखवली. उपस्थित पालकांनीही विद्यार्थ्यांचे मनापासून कौतुक केले आणि त्यांना प्रोत्साहन दिले. या क्रीडा महोत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी क्रीडा संचालक दीपक माने, क्रीडा शिक्षक पुरुषोत्तम सोळंके, वैशाली सोळंके, सचिन मंजुळे, शैक्षणिक विभाग प्रमुख धनंजय सोमवंशी, जी.बी. ऑगस्टन, सुनिता सुरवसे यांसह सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी, पालक आणि विद्यार्थ्यांनी मोलाचे सहकार्य केले. या कार्यक्रमासाठी प्रशासकीय अधिकारी बुरुकुल आणि देवेंद्र सोळंके यांचीही उपस्थिती होती.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अर्चना जाधव यांनी अत्यंत कार्यक्षमतेने केले तर आभार प्रदर्शन विजया माला घाटुल यांनी केले.

# आता गुंठेधारकांचे नावही सातबाऱ्यावर लागणार

सरकारचा मोठा निर्णय


पुणे : आता गुंठेधारकांचे नावही सातबाऱ्यावर लागणार आहे. महाराष्ट्र राज्याच्या महसूल विभागाने याबाबत एक निर्णय जाहीर केला आहे. त्यानुसार, आता छोटे भूखंड विनाशुल्क नियमित केले जाणार आहे. महसूल विभागाने याबाबत कार्यपद्धती जारी केली आहे. सरकारच्या या निर्णयाचा फायदा तब्बल ६० लाख मालमत्ताधारक आणि ३ कोटी नागरिकांना होणार आहे.

सरकारच्या या निर्णयामुळे सातबाऱ्यावर अनेक वर्षांपासून दिसणारा 'तुकडेबंदी कायद्याविरुद्ध व्यवहार' हा शेरा कायमचा वगळला जाणार आहे. त्यामुळे अशा जमिनींची नोंदणी, खरेदी-विक्री, कर्ज प्रक्रिया आणि इतर सरकारी लाभ मिळवणे सुलभ होणार आहे. अनेकदा गुंठेवारीने घेतलेल्या जमिनींची नोंद झाली नव्हती. 'तुकडेबंदी' कायद्यामुळे सातबारा उताऱ्यावर होत नव्हती. या निर्णयामुळे आता सातबाऱ्यावर नाव लागणार आहे. जर यापूर्वी खरेदीचा फेरफार रद्द झाला असेल. तर तो पुन्हा तपासून मंजूर केला जाईल आणि खरेदीदाराचे नाव कब्जेदार म्हणून लावले जाईल. महसूल विभागाने जारी केलेली नवीन कार्यपद्धती १५ नोव्हेंबर १९३५ ते १५ ऑक्टोबर २०२४ दरम्यान झालेल्या व्यवहारांना लागू असेल. ३ नोव्हेंबर रोजी यासंदर्भातील राजपत्र जारी करण्यात आले आहे. या संदर्भातील सर्व सूचना जिल्हाधिकारी, तहसीलदार आणि महसूल प्रशासनाला पाठवल्या आहेत.

हे मिळणार फायदे : १) आता अनोंदणीकृत व्यव्हारांसाठी संधी मिळणार आहे. २) तुमचे सातबाऱ्यावर नाव लागणार आहे. ३) जमिनीची पुन्हा विक्री किंवा हस्तांरण करण्यासाठी कोणतीही अडचण येणार नाही. ४) खरेदीदारांचे नाव कब्जेदार म्हणून लावण्यात येईल.



## केंद्र सरकार सेंद्रिय गव्हाच्या पीठ निर्यातीला परवानगी देण्याची शक्यता



दिल्ली : एकीकडे मागील तीन वर्षांहून अधिक कालावधीपासून केंद्र सरकारने गव्हाच्या निर्यात बंदीचा फास आवळून ठेवला आहे. त्यामुळे गहू उत्पादकांना मोठा फटका बसतोय. गव्हावरील निर्यात बंदी उठवण्याची मागणी शेतकऱ्यांकडून केली जात आहे. आता या मागणीवर केंद्र सरकार सकारात्मक असल्याची चर्चा मागील काही महिन्यांपासून सुरु आहे. त्यातच आता केंद्र सरकारने गव्हाच्या सेंद्रिय पिठाच्या मर्यादित निर्यातीसाठी हालचाली सुरु केल्या आहेत.

भारत ५ लाख टन सेंद्रिय पिठाच्या निर्यातीला परवानगी देण्याची चिन्हं आहेत. यंदाच्या मॉन्सून हंगामात चांगला पाऊस झाला. तसेच देशातील संरक्षित साठा पुरेसा आहे. त्यामुळे केंद्र सरकार गहू, पीठ, मैदा आणि रवा यांच्यावरील निर्यात उठवण्याची चिन्हं दिसत आहे, असे वरिष्ठ अधिकारी सुत्रांनी इंडिया टूडेला सांगितलं आहे. तीन वर्षाहून अधिक काळ लोटल्यानंतर गहू आधारित उत्पादनांच्या निर्यातीसाठी हालचाली सुरु झाल्या आहेत. देशात सध्या गव्हाचा पुरेसा संरक्षित साठा शिल्लक आहे. तसेच गहू खरेदीचा जोरही देशांतर्गत बाजारात वाढत आहे. त्यातच महागाई ०.३ टक्के निच्चांकी पातळीवर आहे. त्यामुळे गहू आणि गव्हाच्या उत्पादनांवरील नियंत्रण सैल होण्याची शक्यता जाणकारांकडून व्यक्त केली जात आहे. परंतु मागील तीन वर्षात गहू निर्यातबंदीच्या तडाख्याने गहू उत्पादकांना मोठा फटका बसल्याचे शेतकरी सांगतात. २०२२ मध्ये निर्यात बंदी लागू होण्यापूर्वी भारताची गहू निर्यात २.१२ अब्ज डॉलर्सच्या विक्रमी पातळीवर पोहोचली होती. परंतु केंद्र सरकारच्या गहू निर्यात बंदीने त्यावर जोरदार प्रहार केला. सध्या मर्यादित प्रमाणात सेंद्रिय पिठाची निर्यात पुन्हा सुरू केली जात असली तरी, या हालचालीमुळे जागतिक पुरवठा सुधारू शकतो. विशेषतः आशिया, आफ्रिका आणि मध्य पूर्वेतील आयात-अवलंबित देशांमध्ये त्याचा परिणाम दिसू शकतो. तसेच या हालचालीमुळे भारतीय मिलर्स आणि प्रक्रियादारांसाठी सेंद्रिय धान्य उत्पादनांची जागतिक मागणी निर्माण होईल, ज्यामुळे त्यांचा नफा वाढेल, असे जाणकार सांगतात.

खरेदी ३०० लाख टन

केंद्र सरकारने २०२४-२५ च्या रब्बी पणन हंगामात ३० जून २०२५ पर्यंत ३०० लाख टन गव्हाची सरकारी खरेदी केली आहे. मागील तीन वर्षातील सर्वाधिक गव्हाची खरेदी सरकारला करता आली आहे. केंद्र सरकारने ३१० लाख टन गहू खरेदीचे उद्दिष्ट ठेवले होते. गेल्या तीन वर्षात उत्पादन विविध कारणांनी उत्पादनात घट आली होती. त्यामुळे केंद्र सरकारला खरेदीचे उद्दिष्ट गाठता आले नाही.

## मत्स्यपालनासाठी शेणखतापासून तयार करा माशांचा चारा



शेतीसोबतच शेतकरी मत्स्यपालनही मोठ्या प्रमाणावर करतात. यातून शेतकऱ्यांना चांगले उत्पन्न मिळते. याशिवाय मत्स्यपालनासाठी शासनाकडून शेतकऱ्यांना आर्थिक मदतही केली जाते. काहीवेळा शेतकऱ्यांना मत्स्यपालनाशी संबंधित फारशी माहिती नसल्याने मत्स्यपालनात नुकसान सहन करावे लागते. त्यामुळे मत्स्यपालनाशी संबंधित अशा तंत्रांबद्दल माहिती असणे आवश्यक आहे.

तळ्याची खोली किती असावी : मत्स्यपालनासाठी तलावाची खोली पाच ते सहा फूट असावी जेणेकरून माशांची वाढ झपाट्याने होईल. पाच ते सहा फूट खोल तलावामध्ये सूर्यकिरण प्लँक्टन उचलतात आणि तलावाच्या पृष्ठभागावर पोहोचतात. त्यामुळे तलावाच्या खोलीपर्यंत प्लँक्टन आढळून येतो. विशेष म्हणजे पाण्याच्या वेगवेगळ्या पातळ्यांवर प्लवकांचे प्रमाणही वेगवेगळे असते. वरच्या स्तरावर जास्त प्रकाश पडल्यामुळे एकूण प्लवकांपैकी सुमारे ६० टक्के येथे उपस्थित आहे. तर तलावाच्या मधल्या आणि खालच्या पातळीवर २० टक्के प्लँक्टन उपलब्ध आहे. यामुळे सर्व मासे वेगवेगळ्या स्तरावर अन्न शोधतात.

संमिश्र मत्स्यपालन वापरा : कॉमन कॉर्प आणि कतला वरच्या आणि मध्यम स्तरावर अन्न शोधतात. तर सिल्व्हर कॉर्प आणि नॅनी खालच्या स्तरावर जेवण करतात. म्हणून संपूर्ण तलावाचे विविध स्तरांवर शोषण करण्यासाठी संमिश्र मत्स्यसंवर्धनाचा वापर केला पाहिजे. विशेषत: मत्स्य शेतकरी तलावात जिरे टाकतात मात्र पैशाअभावी त्यांना योग्य प्रमाणात चारा मिळत नाही. त्यामुळे माशांची वाढ वेगाने होत नाही. अशा स्थितीत मत्स्य उत्पादकांना फारसा फायदा मिळत नाही.

शेणामुळे माशांचे वजन वाढेल : जर शेतकऱ्यांकडे माशांचे खाद्य खरेदी करण्यासाठी पैसे नसतील तर ते स्वत: घरी माशांचे खाद्य तयार करू शकतात. यासाठी शेतकरी गाई-म्हशींच्या शेणाचाही वापर करू शकतात. गाईच्या शेणावरही मासे जगू शकतात. शेतकरी थेट तलावात शेण टाकू शकतात. याशिवाय शेळीची विष्ठाही वापरता येते. शेळीची विष्ठा पावडरमध्ये बारीक करून तळ्यात मिसळा, जे चारा म्हणून काम करेल. शेळीची विष्ठा पाण्यात सहज विरघळते, त्यामुळे मासे ते सहज खाऊ शकतात. सुरुवातीला २ हजार किलो शेण टाका. भारतीय कृषी संशोधन परिषदेने केलेल्या संशोधनात हे सिद्ध झाले आहे की, शेणात असलेले घटक खाल्ल्याने मासे जलद वाढतात. यामुळेच आयसीएआरने माशांसाठी ग्लोबल गोळ्याही बनवल्या आहेत. याचे कारण म्हणजे शेणात नायट्रोजन मोठ्या प्रमाणात आढळतो आणि मासे ते खातात तेव्हा त्यांचे वजन झपाट्याने वाढते. एक हेक्टरमध्ये मत्स्यशेती सुरू केल्यास प्रथम तलावात २ हजार किलो शेण घाला आणि त्यानंतर दरमहा १ हजार किलो शेण घाला. त्यामुळे माशांचे वजन झपाट्याने वाढेल आणि तुमचे उत्पन्नही वाढेल.

## नवजात वासराचे आरोग्य व्यवस्थापन



गर्भावस्थेदरम्यान गर्भाशयामध्ये वासराची वाढ सुसंगत, नियंत्रित आणि संरक्षित तणावमुक्त वातावरणात विकसित होतो. गर्भधारणेच्या शेवटच्या टप्प्यात संप्रेरकाच्या प्रभावामुळे वासरात अनेक परिपक्वतेचे बदल होतात, जेणेकरून ते स्वतंत्र अवस्थेत जगण्यास तयार होऊ शकते. या गर्भातील तयारीनंतरही, प्रसूतीनंतर वासराला त्याच्या आजूबाजूच्या वातावरणातील अचानक बदलांना त्वरित अनुकूल व्हावे लागते. सामान्य प्रसूतीमध्ये, वासरू सहजपणे या संक्रमणावर मात करू शकतो.मात्र, जन्मानंतर काही काळापर्यंत काही महत्त्वपूर्ण घडामोडी घडणे आवश्यक असते. त्यामुळे प्रसूतीस मदत करणाऱ्या किंवा देखरेख करणाऱ्या व्यक्तींनी नवजात वासरामध्ये होणाऱ्या बदलांना ओळखून वेळीच योग्य उपाय व उपचार करणे आवश्यक असते.

नैसर्गिक श्वसनाची सुरुवात : सामान्य प्रसूतीमध्ये, नवजात वासराच्या श्वसनाची हालचाल ६० सेकंदांच्या आत सुरू होते. प्रसूतीला विलंब झाल्यास कधी कधी वासरू गर्भातून बाहेर येण्यापूर्वीच श्वसन सुरू करते. प्रसूती दरम्यान, वार वेगळा होण्यास सुरुवात झाल्यामुळे आणि नाळेच्या अडथळयामुळे रक्तातील दोष वाढतो.स्पर्शात्मक आणि तापमानातील बदल देखील श्वसन सुरू होण्यासाठी महत्त्वाचे असतात.

नुकत्याच व्यालेल्या गायी वासराला चाटून आणि नाकाने स्पर्श करून श्वसनास उत्तेजन देतात.वासराचा जन्म झाल्यानंतर लगेचच वरच्या श्वसन मार्गातील द्रव मधल्या हाताच्या बोटांनी काढून टाकावा. वासराच्या मागच्या पायांना वर करून ठेवले असता शरीरातील द्रव बाहेर पडतो. काही प्रमाणात द्रव पोटातूनही येऊ शकतो. मऊ सुती कपडा किंवा टॉवेलने छातीवर जोमाने घासल्यास स्पर्शात्मक उत्तेजन मिळून श्वसनास मदत होते. जर नैसर्गिक श्वसन सुरू नसेल, तर नाक पिळणे, नाकात बोटांनी हळूवारपणे हालचाल करणे किंवा थंड पाणी शिंपडणे केल्यास मदत होते. काही औषधे श्वसन वाढवण्यासाठी वापरता येतात. जर दोन ते तीन मिनिटांत श्वसन सुरू झाले नाही, तरी हृदयाचा ठोका मजबूत असेल, तरीही वासराचे जगण्याचे शक्यता कमी असते.

पोटाचे विकार : सामान्य प्रसूतीमध्ये वासराला सौम्य पोटाचा विकार असू शकतो, जो काही तासांत सुधारतो आणि श्वसन विकार ४८ तासांपर्यंत राहू शकतो.अडथळायुक्त प्रसूती मुळे तीव्र या प्रकारचे अडथळे होऊ शकतात, ज्यामुळे श्वसन आणि हृदय क्रियेवर वाईट परिणाम होतो.त्यामुळे वासराची चपळता, दूध शोषण्याची क्षमता कमी होते आणि त्यामुळे गाईच्या चिकामधून मिळणारी रोगप्रतिकारक शक्ती कमी होते. पोटाचा विकार प्रामुख्याने उतींमधून ज्वलनशील पदार्थ तयार होण्यामुळे होते.अशुद्ध हवेमुळे वासराचे श्वसन नीट होत नसेल तर श्वसन विकार वाढवू शकतो.म्हणून वासराचे श्वसन सुरळीत असणे अत्यावश्यक असते. प्राथमिक उपाय : जे वासरू पुन्हा श्वसन सुरू करण्यासाठी कृत्रिम प्रयत्न करणे, ते बहुधा रक्तातील बायकार्बोनेटचे प्रमाण कमी आणि श्वसन विकार यास एकत्रितपणे ग्रासलेले असते.फुफ्फुसातील हवेची देवाणघेवाण सुधारल्यामुळे आणि उतींना पुरेसा रक्तपुरवठा झाल्यामुळे श्वसन विकार कमी होतो. रक्तातील गॅस विश्लेषणाद्वारे ॲसिडोसिसचा स्तर तपासता येतो. मात्र, (प्रत्यक्ष कार्यस्थळी) हे शक्य नसते.जर नवजात वासराला कोणत्याही प्रकारचा विकार असेल तर पशुतज्ज्ञांचे मार्गदर्शनाने त्वरित उपचार करावेत.

तापमान नियमन : चयापचय दर वाढवणे महत्त्वाचे असते. नवजात वासराच्या शरीरात त्वचेखाली चरबी खूपच कमी असते, त्यामुळे उष्णतेपासून संरक्षण कमी असते.वासराला पुरेसा आहार द्यावा. प्रसूती थोड्याशा उबदार वातावरणात व्हावी याची काळजी घ्यावी. वासराच्या अंगावरील केस लगेच आणि पूर्णपणे सुकवावेत, ज्यामुळे उष्णतेचा त्रास कमी होतो. वासराला गायी जवळ परत नेईपर्यंत उबदार वातावरणात ठेवावे.

नाळेची काळजी : नाळेवरील रक्त वाहिनी थांबवणारा क्लॅम्प काढल्यानंतर रक्तस्राव होत आहे का हे तपासावे. रक्तस्राव होत असल्यास, योग्य दोऱ्याने नाळ बांधावी. नाळ पोटाच्या खूप जवळ कापू नये, कारण रक्तस्राव झाल्यास दुसरा गाठ बांधणे शक्य होते. जन्मानंतर नाळेत स्वाभाविक आकुंचन होऊन त्यातील रक्त नवजात वासराला परत मिळते, ज्यामुळे रक्तस्राव कमी होतो.नाळेवर हळूवार जंतुनाशक लावावे.

चीक पाजणे महत्त्वाचे : नवजात वासराला गाईच्या सडातून निघालेला चीक मिळाले पाहिजे. सामान्यतः वासरू आपोआप सड शोधून चीक पिते. वासराचा जन्म शस्त्रक्रियेद्वारे किंवा मदतीने झाला असेल, तर त्याला दूध पिण्यास मदत करावी लागते. जन्मानंतरच्या पहिल्या २४ तासांत चीक दिले गेले पाहिजे, कारण त्यानंतर त्याचे शोषण खूपच कमी होते. कोलोस्ट्रममध्ये प्रतिजैविके असतात, जे वासराला आजारांपासून संरक्षण करतात. आक्रमक जनावरांपासून संरक्षण : प्रसूत झालेली गाय काही वेळा नवजात वासरावर हल्ला करू शकते. अशा वेळी वासराला शारीरिक संरक्षण दिले पाहिजे. गाईपासून काहीवेळा वासराला बाजूला ठेवावे.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१७८९ : न्यूजर्सी अमेरिकेचे पहिले राज्य बनले.
१८६६ : आजच्याच दिवशी अमेरिकेतील वाशिंगटन या शहरात हावर्ड या जागतिक विद्यापीठाची स्थापना करण्यात आली होती.
१८७७ : थॉमस अल्वा एडिसन यांनो ग्रामोफोन चा शोध लावला.
१९१७ : युक्रेन प्रजासत्ताक बनले.
१९१७ : कलकत्ता या शहरी आजच्याच दिवशी बोस या संशोधन केंद्राची स्थापना करण्यात आली होती.
१९४५ : न्युरेम्बर्ग ट्रायल्स दुसऱ्या महायुद्धातील गुन्ह्यांसाठी २४ जणांवर खटला सुरू झाला.
१९५५ : पौली उम्रीगर या भारतीय क्रिकेट पटू ने आजच्याच दिवशी न्यूझीलंड विरुध्द कसोटी खेळात द्विशतक झळकावले होते.
१९५९ : युनायटेड नेशन्सने बालहक्कांच्या घोषणापत्राची दखल घेतली.
१९६८ : अमेरिकेने आजच्याच दिवशी नेवाडा येथे अण्वस्त्र परीक्षण केले.
१९८१ : आफ्रिकेतील देश बुरुंडी ने आजच्याच दिवशी संविधानाचा स्वीकार केला होता.
१९८१ : आजच्याच दिवशी भारताच्या भास्कर या उपग्रहाला अंतराळात सोडण्यात आले होते.
१९८५ : मायक्रोसॉफ्ट विंडोज १.० प्रकाशीत झाले.
१९९४ : भारताची ऐश्वर्या राय 'मिस वर्ल्ड' किताबाची मानकरी बनली.
१९९७ : अमेरिकेच्या 'कोलंबिया' या अंतराळयानातून कल्पना चावला ही पहिली भारतीय महिला अंतराळयात्री आपल्या पहिल्या अवकाशमोहिमेवर रवाना झाली.
१९९८ : 'इंटरनॅशनल स्पेस स्टेशन'चे प्रक्षेपण झाले.
१९९९ : अनाथ आणि निराधार बालकांच्या संगोपनासाठी दिला जाणारा प्रतिष्ठेचा 'हॅरी होल्ट पुरस्कार' लता जोशी यांना जाहीर.
१९९९ : आर.जी.जोशी फाऊंडेशनतर्फे दिला जाणारा 'राष्ट्रीय एकात्मता पुरस्कार' राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रचारक मोरोपंत पिंगळे यांना जाहीर
२००८ : अमेरिकेतील आर्थिक संकटामुळे 'डाऊ जोन्स' निर्देशांक १९९७ पासुनच्या नीचांकी पातळीवर पोहोचला.
२०१६ : भारताची बैटमिन्टनपटूपी वी सिंधूहिने आजच्याच दिवशी चायना ओपन सुपर सिरीज अंतिम सामन्यामध्ये चीनच्या सून यु को हिचा पराजय करित पहिला सुपर सिरीज पुरस्कार आपल्या नावी केला होता.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१६०२ : जर्मन भौतिकशास्त्रज्ञ ऑट्टो फोन ग्वेरिक यांचा जन्म.
१७५० : शहाबहादूर फतेह अली खान ऊर्फ टिपू सुलतान हैदरअलीचा थोरला मुलगा व मैसूरचा वाघ (मृत्यू: ४ मे १७९९)
१८५४ : कवी, निबंधकार व नाटकाकर मोरो गणेश लोंढे यांचा जन्म.
१८८९ : एडविन हबल - अमेरिकन खगोलशास्त्रज्ञ (मृत्यू: २८ सप्टेंबर १९५३)
१८९२ : इंसुलिन चे सह्संशोधक जेम्स कॉलिप यांचा जन्म. (मृत्यू: १९६५)
१९०५ : मिनोचर रुस्तुम तथा 'मिनू' मसानी संसदपटू, अर्थतज्ञ, घटनापंडित व स्वतंत्रता पक्षाचे नेते (मृत्यू: २७ मे १९९८)
१९१० : डच भौतिकशास्त्र विलेम जेकब व्हान स्टॉकम यांचा जन्म.
१९२४ : फ्रेंच गणितज्ञ बेनुवा मँडेलब्रॉट यांचा जन्म.
१९२७ : चंद्रशेखर शंकर धर्माधिकारी मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश, वकील, लेखक, स्वातंत्र्यसैनिक, पद्मभूषण.
१९३९ : वसंत पोतदार - मराठी साहित्यिक (३० एप्रिल २००३ नाशिक)
१९४१ : उर्दू लेखिका हसीना मोईन यांचा जन्म.
१९६३ : इंग्लिश गणितज्ञ तिमोथी गॉवर्स यांचा जन्म.
१९६९ : अभिनेत्री शिल्पा शिरोडकर यांचा जन्म.
१९८९ : भारतीय महिला कुस्तीपटू बबिता फोगाट हिचा आजच्याच दिवशी जन्म झाला होता.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८५९ : माऊंट स्ट्युअर्ट एल्फिस्टन - स्कॉटिश मुत्सद्दी, हिन्दुस्थानातील मुंबई प्रांताचे गवर्नर, कुशल प्रशासक व इतिहासकार. त्यांनी सामाजिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रात आमूलाग्र बदल घडवून आणले. त्यांनी हिस्ट्री ऑफ इंडिया' या दोन खंडात भारताचा इतिहास लिहिला. (जन्म: ६ आक्टोबर १७७९)
१८८४ : लेनिन शांतता पुरस्कार विजेते ऊर्दू शायर फैज अहमद फैज यांचे निधन. (जन्म: १३ फेब्रुवारी १९११)
१९०८ : बंगालमधील सुप्रसिद्ध क्रांतिकारक कन्हय्यालाल दत्त यांना फाशी.
१९१० : लिओ टॉलस्टॉय - रशियन लेखक (जन्म: ९ सप्टेंबर १८२८)
१९५४ : सेसेना एअरक्राफ्ट कॉर्पोरेशनचे संस्थापक क्लाइड व्हर्नन सेसेना यांचे निधन. (जन्म: ५ डिसेंबर १८७९)
१९७० : यशवंत खुशाल देशपांडे - महानुभाव वाङ्मयाचे नामवंत संशोधक, १९३९ मधे झुरिच येथे झालेल्या जागतिक इतिहास परिषदेतील भारताचे प्रतिनिधी (जन्म: १४ जुलै १८८४)
१९७१ : स्पेन या देशाचा हुकुमशाह फ्रेंको याचे निधन झाले होते.
१९७३ : केशव सीताराम तथा प्रबोधनकार ठाकरे - पत्रकार, समाजसुधारक, लेखक, वक्ते व संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील एक प्रमुख कार्यकर्ते (जन्म: १७ सप्टेंबर १८८५)
१९८४ : फैज अहमद फैज - लेनिन शांतता पुरस्कार विजेते ऊर्दू शायर (जन्म: १३ फेब्रुवारी १९११)
१९८९ : 'गानहिरा' हिराबाई बडोदेकर - भारतीय संगीत क्षेत्रातील अध्वर्यू. 'पुण्यप्रभाव', 'सौभद्र', 'विद्याहरण', 'युगांतर' आदी नाटकांत त्यांनी नायिकेच्या भूमिका केल्या. नाटकांतील पदांच्या त्यांच्या ध्वनिमुद्रिका खूप गाजल्या. १९७० मधे त्यांना 'विष्णूदास भावे सुवर्णपदक' देण्यात आले. (जन्म: १९ मे १९०५ बडोदा)
१९९७ : शांताराम शिवराम तथा आचार्य बाळाराव सावरकर - स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकरांचे स्वीय सहाय्यक (कोणतेही नाते नव्हते), हिन्दू महासभेचे अध्यक्ष.
१९९८ : दत्तात्रेयशास्त्री तांबे गुरूजी - संस्कृतच्या विविध शास्त्रांतील पंडित, प्रख्यात मीमांसक.
१९९९ : दत्ता महाडिक पुणेकर - तमाशा कलावंत (सोंगाड्या).
२००३ : सेंट्रल आफ्रिकन रिपब्लिकचे पहिले राष्ट्राध्यक्ष डेव्हिड डेको यांचे निधन. (जन्म: २४ मार्च १९३०)
२०१४ : भारताची प्रसिध्द कवियत्री निर्मला ठाकूर यांचे आजच्या दिवशी निधन झाले होते.



# राज्य लोकतंत्र मराठवाडा वृत्तांत

गुरूवार दि.२० नोव्हेंबर २०२५ ५




# मुशायरा निवेदक अन्वर कमिशनर यांच्या निधनानिमित्त शोकसभा



लातूर । प्रतिनिधी

सुप्रसिद्ध शैक्षणिक आणि साहित्यिक व्यक्तिमत्त्व, प्रसिद्ध मुशायरा निवेदक असलेले कै. अन्वर हुसेन कमिशनर यांच्या निधनानिमित्त खादमाने उर्दू फोरम सोलापूर आणि शमा एज्युकेशन सोसायटी सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने शमा उर्दू स्कूलमध्ये एका शोक सभेचे आयोजन माजी प्राचार्य अब्दुल मन्नान शेख यांच्या अध्यक्षते खाली करण्यात आले होते. या सभेत विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी कै. कमिशनर यांना श्रद्धांजली वाहिली.

शमा एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष अयुब नलामंदू यांनी आपले तीव्र दुःख व्यक्त करताना कै अन्वर कमिशनर यांचे निधन हे उर्दू भाषेचे न भरून येणारे नुकसान असल्याचे नमूद केले. सभेचे अध्यक्ष, माजी प्राचार्य अब्दुल मन्नान शेख यांनी कै. कमिशनर यांच्या प्रामाणिकपणाचे, मेहनतीचे आणि दूरदृष्टीचे कौतुक करत त्यांना आदरांजली अर्पण केली. भारतीय उर्दू विकास फाउंडेशनचे अध्यक्ष सुलतान अख्तर यांनी शोक व्यक्त करताना सांगितले की, कै. अन्वर कमिशनर हे चांगल्या काव्य प्रतिभेचे धनी होते. ते एका उत्तम निवेदक (नाजिम) म्हणून जसे आपले वेगळे स्थान राखून होते, तसेच ते एक सभ्य आणि सुसंस्कृत व्यक्ती देखील होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. शफी चौबदार यांनी केले, ज्यांनी आपल्या प्रेमळ भाषणात अन्वर कमिशनर यांच्या व्यक्तिमत्त्वावर प्रकाश टाकत त्यांच्या आठवणींना उजाळा दिला.कै. अन्वर कमिशनर यांच्या कुटुंबियांपैकी त्यांच्या दोन्ही मुली, दोन्ही जावई, पुत्र आतिफ कमिशनर आणि बंधू फारूक कमिशनर हे उपस्थित होते. याप्रसंगी माजी प्राचार्य डॉ .सिराज मोमीन , शकील काद्री, रफीक खान , महेमूद नवाज ,जाफर बांगी, एहसान नझीर मुन्शी, शफी कॅप्टन, अलीमुद्दीन दंडोती, सय्यद इक्बाल , मौला अली लोकापल्ली, कवी शांदा पीतांपुरी , आणि कै . कमिशनर यांची मुलगी रुही व इतर प्रतिष्ठित व्यक्तींनी सहभाग घेतला आणि कुटुंबियांचे सांत्वन केले. सर्व उपस्थितांनी अन्वर कमिशनर यांच्या आत्म्याला शांती मिळो आणि कुटुंबियांना हे दुःख सहन करण्याची शक्ती मिळो यासाठी प्रार्थना (दुवा) केली. आभार मझहर अल्लोळी यांनी मानले.

## विद्यार्थ्यांना घडविण्यासाठी शाळेतील विद्यार्थांचा जिल्हाधिकाऱ्यांनी यांनी घेतला वर्ग



जालना । प्रतिनिधी

सदस्थितीत जिल्हात मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाची अंमलबजावणी सुरू असून यातंर्गत आज दि. १८ नोव्हेंबर २०२५ रोजी विद्यार्थ्यांना घडविण्यासाठी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी घनसावंगी तालुक्यातील राजेगाव शाळेस भेट देवून विद्यार्थांशी संवाद साधला व मुलांचा अभ्यास देखील घेतला. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा राजेगाव येथील परिसराची जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी पाहणी केली व नंतर त्यांनी आठवीच्या वर्गात जाऊन मुलांना स्वतः गणित विषयाची उदाहरणे दिली व सोडविण्यासाठी सांगितले. मुलांनी जिल्हाधिकारी यांनी विचारलेल्या सर्व प्रश्नांची उत्तरे दिली. मुलांची गुणवत्ता बघून जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी सर्व मुलांचे व शाळेचे कौतुक केले.

यावेळी त्यांनी राजेगाव येथील ग्राम पंचायत, मंदिर तसेच गावाची पाहणी केली. यावेळी उप जिल्हाधिकारी सामान्य प्रशासन श्रीमती नम्रता चाटे, उपविभागीय अधिकारी अंबड उमाकांत पारधी, तहसीलदार घनसावंगी वंजारी मॅडम नायब तहसीलदार इथापे, ग्रामसेवक धर्मा लहामगे, यांच्यासह राजेगाव येथील गजानन उगले नवनाथ उगले, श्रीधन कोरडे,विठ्ठल उगले,वसंत कोरडे,भरत कोरडे तुकाराम सपाटे,राजेंद्र थोरात, गुलाबराव सपाटे,आसाराम कोरडे,राजेंद्र उगले,भरत कोरडे, परमेश्वर टरले,भागवत उगले,नवनाथ सपाटे,किसन सपाटे शालेय समिती राजेगाव व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा राजेगाव येथील कल्याण वाघमारे, कैलास आरगडे, अमोल धांडगे, कसबे सर,श्रीमती घुले ,श्रीमती शेळके , पोषण आहार मदतनीस उगले,छाया देवडे, यांची उपस्थिती होती.

## थोडक्यात

### ग्रामीण पत्रकार संघाच्या महाराष्ट्र संघटकपदी विकासकुमार बागडी

जालना । प्रतिनिधी



पत्रकारांच्या न्याय हक्कासाठी लढणारी अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघच्या महाराष्ट्र संघटकपदी जालना येथील जालना समाचारचे संपादक विकासकुमार बागडी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांची ही नियुक्ती अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष मनोहर सुने यांच्या आदेशाने महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष तथा राष्ट्रीय संघटक कैलास देशमुख यांनी एका नियुक्तीपत्रकाव्दारे केली आहे. विकासकुमार बागडी हे मागील २८ वर्षापासून पत्रकारीता क्षेत्रात आहे. ते पत्रकारांचे विविध प्रश्न व हितासाठी काम करीत असून, त्यांच्या या कार्याची दखल घेवून त्यांना महाराष्ट्र संघटकपदाची जवाबदारी देण्यात आली आहे. आगामी काळात पत्रकारांची एकजुट करण्यासह त्यांच्या हितासाठी काम करणार असल्याची ग्वाही नुतन महाराष्ट्र संघटक विकासकुमार बागडी यांनी दिली आहे. त्यांच्या या नियुक्तीबद्दल त्यांचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष युसूफखान पठाण, केंद्रीय नियोजन समिती अध्यक्ष सुरेश सवळे, राष्ट्रीय उपाध्यक्ष राजेंद्र भुरे, राष्ट्रीय महासचिव अशोक पवार, महाराष्ट्र प्रदेश महिला मंच सरचिटणीस कांचनताई मुरके , तसेच जिल्ह्याचे जेष्ठ पत्रकार, संपादक, जिल्हा प्रतिनिधी, उद्योजक, व्यापारी, सामाजिक कार्यकर्ता आदिंनी अभिनंदन केले आहे.

### अल्पवयीन मुलीच्या विनयभंग प्रकरणात आरोपीस तत्काळ अटक

लातूर । प्रतिनिधी

लातूर शहरातील गांधी चौक पोलिस ठाणे हद्दीत घडलेल्या अल्पवयीन मुलीच्या विनयभंगाच्या गंभीर प्रकरणात लातूर पोलिसांनी अतिशय जलद, काटेकोर आणि संवेदी पद्धतीने कारवाई करत आरोपीस अटक केली. विशेष म्हणजे, गुन्हा नोंद झाल्यानंतर केवळ २० तासांत तपास पूर्ण करून न्यायालयात दोषारोप पत्रही दाखल केले आहे.तक्रारीनुसार १७ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी साडे दोनच्या सुमारास इसराईल कलीम पठाण (वय २७, रा. गौसपुरा, लातूर) हा फिर्यादीच्या घरात अनधिकृतपणे घुसला आणि अल्पवयीन मुलीचा हात धरून विनयभंग केला. यापूर्वीही आरोपीने मुलीचा वारंवार पाठलाग करणे, तसेच तिच्या कुटुंबीयांना जिवे मारण्याच्या धमक्या देणे असे प्रकार घडल्याचे तक्रारीत नमूद आहे. या सततच्या त्रासामुळे पीडितेच्या कुटुंबावर मोठा मानसिक ताण निर्माण झाला होता. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन गांधी चौक पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ७४, ७८, ३३३, ३५१(२) (३) तसेच बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा कलम ८ व १२ नुसार नोंदविण्यात आला. गुन्हा नोंद होताच पोलिस अधीक्षक अमोल तांबे यांनी केलेल्या सूचनांनुसार अपर पोलिस अधीक्षक मंगेश चव्हाण व उपविभागीय पोलिस अधिकारी समीरसिंह साळवे यांच्या मार्गदर्शनात पोलिस निरीक्षक सुनील रेजितवाड यांनी आरोपीचा शोध घेण्यासाठी दोन स्वतंत्र पथके तयार केली. गुप्त माहिती व स्थानिक तपासाच्या आधारे आरोपी इसराईल पठाण यास ताब्यात घेण्यात आले आणि कायदेशीर अटक प्रक्रिया पूर्ण करण्यात आली.

# आ. अर्जुनराव खोतकर यांच्या हस्ते सीसीआय कापूस केंद्राचे उद्घाटन

जालना । प्रतिनिधी

जालना कृषी उत्पन्न बाजार समिती येथे कापूस उत्पादकांसाठी दिलासादायक ठरणाऱ्या सीसीआयच्या कापूस खरेदी केंद्राचं उद्घाटन आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शेतकऱ्यांना पहिल्याच दिवशी आठ हजार रुपये भावाने कापूस खरेदी करण्यात आला.

या उद्घाटन प्रसंगी बाजार समितीचे प्रशासक परमेश्वर वरखडे, सचिव भरत तमपुरे, सीसीआयचे केंद्रप्रमुख महेंद्र पटेल, सचिव सेवानिवृत्त अनिल खंडाळे, सचिव सेवानिवृत्त मोहन राठोड लेखापाल अजय मिरकड, सहायक लेखापाल अशोक कोल्हे, शिवानंद पालवे, पर्यवेक्षक संजय जाधव, ओमप्रकाश मंत्री, अनिल सोनी, नंदकिशोर अग्रवाल, अशोक अग्रवाल, दिनेश रुणवाल, रमेश मंदहा, उदघाटनप्रसंगी प्रथम आलेले साळेगाव येथील कापूस उत्पादक शेतकरी गणेश शिंदे यांचा सत्कार करण्यात आला. यावर्षी सीसीआयने कापसाबा हमीभाव ८ हजार ६० रुपये किंटल जाहिर केला असून, शेतकऱ्यांना बाजार भावातील चढ-



उतारापासून निश्चित दिलासा मिळणार आहे. बाजार समितीतून मिळालेल्या माहितीनुसार, सीसीआयकडे कापूस विक्रीसाठी किसान कापास पुर्वनोंदणी अनिवार्य आहे. नोंदणीपासून स्लॉट बुकिंगपर्यंत आणि जिनिंग पर्यंतची संपूर्ण प्रक्रिया बाजार समितीच्या किसान मदत कक्षामार्फत केली जाणार आहे. पुर्व नोंदणीसाठी शेतकऱ्यांनी आधार कार्ड, एक फोटो आणि २०२५-२६ सालचा कापूस पेरा असलेला डिजिटल ७/१२ सोबत आणणे आवश्यक आहे. तसेच खरेदीसाठी कापसाचा ओलावा ८ ते १२ टक्के असणे बंधनकारक असून, यापेक्षा जास्त ओलावा असलेल्या कापसाची खरेदी सीसीआयकडून केली जाणार नाही, अशी माहिती बाजार समितीने दिली आहे. शेतकऱ्यांनी आवश्यक कागदपत्रांची पुर्तता करून शासनाच्या हमीभावाचा लाभ घ्यावा, असे आवाहन बाजार समितीचे प्रशासक परमेश्वर वरखडे आणि सचिव भरत तनपुरे यांनी केले आहे.

# आश्रमशाळेच्या नावाखाली २.४८ कोटींवर डल्ला

अहिल्यानगर । प्रतिनिधी

केंद्र शासनाकडून आश्रमशाळेसाठी मिळालेल्या तब्बल २ कोटी ४८ लाख रूपयांच्या अनुदानात अपहार केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. सद्गुरू रोहिदासजी बहुउद्देशीय ग्रामीण विकास प्रतिष्ठान, आलमगीर रस्ता, विजयनगर, भिंगार (अहिल्यानगर) या संस्थेत हा अपहार झाला असून यासंदर्भात संस्थेच्या अध्यक्षासह सात जणांविरूध्द तोफखाना पोलीस ठाण्यात मंगळवारी (१८ नोव्हेंबर) फसवणूकीचा गुन्हा दाखल झाला आहे.

येथील सहायक आयुक्त समाजकल्याण कार्यालयातील सहायक लेखाधिकारी संदीप हरीभाऊ देठे (वय ४६) यांनी फिर्याद दिली आहे. संस्थेचा अध्यक्ष सुभाष बन्सी साळवे, उपाध्यक्ष मंगल अनिल शिंदे, सचिव अनिल तुळशीदास शिंदे, विश्वस्त संजय बन्सी साळवे, खजिनदार अनिता सुभाष साळवे, विश्वस्त राजू बन्सी साळवे आणि रेखा संजय साळवे (सर्व रा. भिंगार, अहिल्यानगर) यांच्याविरूध्द हा गुन्हा दाखल झाला आहे. भिंगार येथील सद्गुरू रोहिदासजी बहुउद्देशीय ग्रामीण विकास प्रतिष्ठान या संस्थेने २०१५ ते २०२० या कालावधीत केंद्र शासनाकडून केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळेसाठी अनुदान मिळवले होते. शासनाने संस्थेच्या खात्यावर २ कोटी ४८ लाख २१ हजार ४२४ रूपये जमा केले. नियमानुसार हा निधी कर्मचार्यांचे वेतन आणि शाळेच्या भौतिक सुविधांवर खर्च होणे अपेक्षित होते. मात्र, संस्थेचे अध्यक्ष आणि पदाधिकार्यांनी संगनमत करून हा निधी शाळेसाठी न वापरता, तो श्रध्दा एंटरप्रायजेस, सुभाष साळवे, क्षितिज शर्मा व इतर नातेवाईकांच्या वैयक्तिक खात्यावर सुमारे २ कोटी २४ लाख रूपये परस्पर वळविले. धक्कादायक बाब म्हणजे, कर्मचार्याचा मृत्यू झालेला असतानाही, त्यांच्या नावे वेतन काढून शासनाची फसवणूक करण्यात आली. तसेच एकाच कर्मचार्याला शाळा आणि वसतिगृह अशा दोन्ही ठिकाणी कामावर दाखवून बनावट कागदपत्रे तयार केल्याचे चौकशीत निष्पन्न झाले आहे. पोलिसांनी गुन्ह्याची नोंद करून अधिक तपास सुरू केला आहे.

# उपचाराच्या बहाण्याने विनयभंग करणाऱ्या भोंदू बाबाला तीन वर्षे सक्तमजुरीची शिक्षा

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

इलाज करण्याच्या बहाण्याने आईसह मुलीचा विनयभंग करणाऱ्या भोंदू बाबाला तीन वर्षे सक्तमजुरी व पाच हजार रुपये दंड तसेच बाल लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणीही तीन वर्षे सक्तमजुरी आणि पाच हजार रुपये दंडाची शिक्षा विशेष जिल्हा सत्र न्यायधीश ए. आर. उबाळे यांनी सुनावली.

साईनाथ कारभारी गुंजाळ (५५, रा. घृष्णेश्वर कॉलनी, जाधववाडी) असे शिक्षा सुनावलेल्या भोंदू बाबाचे नाव आहे. या प्रकरणात ३० वर्षीय विवाहितेने फिर्याद दिली होती. त्यानुसार डिसेंबर २०२० मध्ये फिर्यादीच्या १७ वर्षीय मुलीला उलट्या व पोटाचा त्रास सुरू झाला होता. त्यांनी अनेक दवाखाने करूनही त्रास थांबत नव्हता. तेव्हा त्यांना कुणीतरी घृष्णेश्वर कॉलनीतील साईनाथ महाराजांकडे जाण्याचा सल्ला दिला. फेब्रुवारी २०२१ मध्ये फिर्यादी कुटुंबासह साईनाथ महाराजाकडे गेली. त्यावेळी मुलीचा त्रास कमी झाल्याने फिर्यादीच्या कुटुंबाचा त्याच्यावरील विश्वास वाढला. ते सकाळ संध्याकाळ महाराजांकडे जाऊ लागले. १३ फेब्रुवारी रोजी भोंदू बाबाने दोघींना वेगवेगळे बसवून डोळे बंद करण्यास सांगितले. आरोपीने फिर्यादीला पायाचा इलाज करण्याच्या नावाखाली अश्लील वर्तन करून विनयभंग केला. मात्र मुलीला बाबाचा गुण पडलेला असल्याने फिर्यादीने दुर्लक्ष केले. रात्री नऊ वाजेच्या सुमारास आरोपीने त्यांना पुन्हा आपल्या घरी बोलावले व फिर्यादीच्या पतीला, तुझ्यात बायको सांभाळण्याची क्षमता नाही, अशा शब्दांत सुनावले. त्यानंतर मुलीने भोंदू बाबाकडे जाण्यासाठी नकार दिला. भोंदू बाबाने आपल्यासोबत अश्लील चाळे करून विनयभंग केल्याचे मुलीने सांगितले. ७ मार्च रोजी भोंदू बाबाने फिर्यादीच्या पतीला दक्षिणा देण्यासाठी बोलावले म्हणून फिर्यादी पतीसह आरोपीच्या घरी गेले. त्यावेळी त्याने पैशाच्या कारणावरून फिर्यादीच्या कुटुंबाला धमकावण्यास सुरुवात केली. त्यानंतर भयभीत झालेल्या कुटुंबीयांनी दिलेल्या तक्रारीवरून हरसूल पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता.

# जेथे बिबट्याचा वावर तेथे शाळांच्या वेळेत बदल

अहिल्यानगर । प्रतिनिधी

जिल्ह्यातील काही भागांत बिबट्यांचे हल्ले वाढत आहेत. पारनेर, कोपरगाव, संगमनेर, राहुरी, अकोले, अहिल्यानगर तालुक्यांमध्ये अशा घटना घडल्या आहेत. शालेय विद्यार्थ्यांचा या हल्ल्यात मृत्यू झाला आहे. यामुळे बिबट्या प्रवण आपत्ती क्षेत्रातील शाळांच्या वेळेत सकाळी ९.३० ते दुपारी ४ असा बदल करण्यास परवानगी देण्यात आली आहे. जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी तसे आदेश दिले आहेत. जिल्ह्यातील सर्व माध्यमाच्या व सर्व व्यवस्थापनाच्या शाळांनी शाळा व्यवस्थापन समिती, शाळा समितीची मंजूरी घेवून वेळेत बदल करावा, असे आदेशात नमूद केले आहे.

जिल्ह्यामध्ये लहान मुलावरील बिबट्यांच्या हल्ल्यांच्या घटना पारनेर, अहिल्यानगर तालुक्यांमध्ये घडल्या आहेत. शालेय विद्यार्थी यामध्ये जखमी व मयत झाले आहेत. दिवसेंदिवस बिबट्यांच्या वाढत्या हल्ल्यांच्या घटना लक्षात घेता विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी शाळेच्या वेळेत बदल करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. जिल्ह्यातील बहुतांश शाळांमधील विद्यार्थी पायी शाळेत येतात व शाळा सुटल्यावर पायी घरी जातात. रस्त्याच्या कडेने ऊस, जंगल, डोंगराळ असे बिबट प्रवण आपत्ती क्षेत्र आहे. सध्या ऊसतोडीमुळे उसाचे क्षेत्र कमी होत असल्याने बिबट्यांचे हल्ल्याचे प्रमाण वाढले आहे. तसेच सद्यस्थितीत हिवाळा ऋतूमुळे सायंकाळी लवकर अंधार पडत असल्याने विद्यार्थ्यांची सुरक्षितता धोक्यात आली आहे. बिबट्यांच्या हल्ल्यामुळे विद्यार्थ्यांना धोका पोहचू नये यासाठी शाळांच्या वेळेत सकाळी ९.३० ते दुपारी ४ असा बदल शाळा व्यवस्थापन समिती/शाळा समितीची मंजूरी घेवून करण्यास परवानगी देण्यात आली आहे. तसेच शाळास्तरावर सकाळच्या परिपाठात सुरक्षिततेबाबत सर्व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे, शाळास्तरावर पालक मेळावे घेऊन शाळेत येताना व शाळा सुटताना पाल्यांना स्वतः घेऊन जाणेबाबत पालकांना कळविण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. प्रत्येक विद्यार्थी सुरक्षित घरी पोहोचल्याची वर्गशिक्षकांनी खात्री करणे आवश्यक आहे. तसेच शालेय स्तरावरील विद्यार्थी सुरक्षा व भौतिक सुविधा विकसन समितीच्या सभा दरमहा घेवून विद्यार्थी सुरक्षेच्या अधिकच्या उपाययोजनांची अंमलबजावणी करावी अशा सूचना दिल्या आहेत. गट शिक्षणाधिकारी यानी आपल्या तालुक्यातील किती शाळांच्या वेळेत बदल झाला याचा अहवाल तात्काळ शिक्षणाधिकारी प्राथमिक व माध्यमिक यांना सादर करावा, असेही आदेशात नमूद केले आहे.


जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२५/५१८
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक :- ०३/०९/२०२५

नाव बदलण्याचा

**जाहिरनामा**

अर्जदार श्री/सौ/श्रीमती : १) सोमिनाथ शंकर डोंगरे २) अमोल शंकर डोंगरे सर्व्हे नं.-११ सहन प्लॉट नं. १९ सिटी सर्व्हे नं. १८७१/ब/१९ नं.प.मि.नं.१८-१४९-१९/२ चे हस्तांतर करणे बाबात

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. (१८-१४९-१९/२) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतों ज्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुः सिमा
पुर्व- याच प्लॉट नं. १९ मधील भाग
पश्चिम : प्लॉट नं. २०
दक्षिण- सर्व्हे नं. ११ मधील भाग
उत्तरः ९ मिटर रुंदीचा कॉलनी अंतर्गत रस्ता

स्वाक्षरित
**मुख्याधिकारी**
नगर परिषद, अंबड


# प्रियसीच्या पतीला जिवे मारण्याच्या उद्देशाने मारहाण

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

पत्नीचे अनैतिक संबंध असल्याच्या संशयावरून पतीने एकास मारहाण केली होती. याचा राग मनात धरून इतरांच्या मदतीने घराचा दरवाजा तोडून महिलेच्या पतीला घरात घुसून त्याने जिवे मारण्याच्या उद्देशाने लोखंडी रॉडने मारहाण करुन त्याचे वाहनामधून अपहरण केल्याची घटना वडगाव येथे घडली.




या विषयी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार वडगाव परिसरात मंगेश (नाव बदलले आहे) हा पत्नी व त्यांच्या एका लहान मुलासह राहण्यास आहे. त्यांच्या घराशेजारी भाड्याने रूम घेऊन राहणारा योगेश जाधव व त्याच्या पत्नीमध्ये अनैतिक संबंध असल्याचा संशय मंगेशला आला होता. यामुळे त्याने योगेश यास अनेकदा समजावून सांगितले, मात्र तो सतत त्याच्या पत्नीसोबत बोलत असे. यामुळे काही दिवसापूर्वी मंगेशने योगेशला मारहाण केली होती. या प्रकरणी मंगेशविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. दरम्यान, १० नोव्हेंबर रोजी सायंकाळी मंगेश हा दुचाकीवरून घरी येत असताना एका अज्ञात चारचाकी चालकाने त्याच्या दुचाकीला धडक दिली होती. या घटनेत मंगेश हा दुचाकीवरून खाली पडल्यानंतर वाहनचालकाने त्यास लोखंडी रॉडने मारहाण करण्याचा प्रयत्न केला होता. मात्र मंगेश याने तेथून पळ काढला होता. मंगेश हा सोमवारी (दि.१७) सायंकाळी साडेसात वाजेच्या सुमारास मित्रासोबत घरी जात असताना योगेश हा एएस क्लब जवळ मंगेशचा पाठलाग करत उभा होता. त्यानतंर रात्री साडेदहा वाजेच्या सुमारास योगेश हा वाहनामधून पाच जणांना सोबत घेऊन मंगेशच्या घरी आला व त्याने मंगेशच्या पत्नीस दार उघडण्यास सांगितले परंतू तिने दार न उघडता त्यास तेथून जाण्यास सांगितले. तेव्हा योगेश व त्याच्यासोबत असलेल्या त्याच्या साथिदारांनी घराचा दरवाजा तोडून मंगेश यास जीवे मारण्याच्या उद्देशाने लाथा-बुक्क्यांनी तसेच लोखंडी रॉडने मारहाण सुरु केली. तसेच मंगेश यास बळजबरीने कारमध्ये बसवून ते त्याला कांचणवाडीकडे घेऊन जात होते. कांचणवाडी जवळ रात्री पोलीसांची नाकाबंदी सुरु होती. आपण आता पकडले जाऊ अशी भिती योगेश व त्याच्या साथिदारांना वाटल्याने त्यांनी मंगेशला कारमधून खाली फेकले. दरम्यान मंगेश याने पोलीस चौकी गाठून पोलीसांना त्याच्यावर ओढवलेला प्रसंग सांगितला. दरम्यान पोलीसांनी मारहाणीत गंभीर जखमी झालेल्या मंगेश यास उपचारासाठी घाटी दवाखान्यात दाखल केले. या प्रकरणी मंगेश याने दिलेल्या तक्रारीवरून योगेश जाधव तसेच त्याच्या पाचा अनोळखी साथीदारांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मंगेश यास लोखंडी रॉडने मारहाण करून जिवे मारण्याच्या उद्देशाने अपहरणाचा प्रयत्न करणारा मुख्य सूत्रधार योगेश नामदेव जाधव (३१, रा. म्हारोळा, ता. पैठण) तसेच दिनेश सोबकचंद मेहर (३४, रा. पेंढापूर ता. गंगापूर) यास गुन्हे शाखेच्या पथकाने ताब्यात घेतले असून, आरोपींनी गुन्ह्यात वापरलेली कारही जप्त केली आहे. ही कामगिरी पोलिस निरीक्षक गजाजनन कल्याणकर, पोलिस उपनिरीक्षक अर्जुन कदम, जमादार योगेश गुप्ता, श्रीकांत काळे, दत्तात्रय गढेकर, पोलिस अंमलदार दादासाहेब झारगड, सोमनाथ दुकळे यांनी केली.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
गुरुवार दि.२० नोव्हेंबर २०२५ | ६

# बीडचा निर्णय ठाम, घड्याळाला मत नाही

## बीडमध्ये आंबेडकरी समाजाची एकजूट ;राजेशाही बीडच्या वेशीबाहेर फेकू



बीड । प्रतिनिधी

**बीड नगर परिषद निवडणुकीत राष्ट्रवादी (अजित पवार गट) कडून झालेल्या दगाफटक्याचा पर्दाफाश करत युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांनी प्रस्थापित पक्षांवर जोरदार प्रहार करित अशा प्रवृत्तिंच्या विरोधात आज (दि.१९) नोव्हेंबर २०२५ रोजी बीड शहरातील आंबेडकरवादी सर्वपक्षीय संघटनांच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची संयुक्त पत्रकार परिषद हॉटेल नीलकमल येथे घेऊन त्यांनी तिकीट वाटपातील गैरव्यवहार, माफिया हस्तक्षेप आणि समाजाला डावलण्याचा कट असल्याचा थेट आरोप केला.**

या संयुक्त पत्रकार परिषदेस युवा रिपाइं प्रदेश अध्यक्ष पप्पू कागदे, डीपीआय प्रदेश अध्यक्ष अजिंक्य चांदणे,वंचितचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे, बबन वडमारे, ज्ञानोबा माने, रवी वाघमारे, अड. देवदत्त शिंदे, अशोक सोनवणे, राजू जोगदंड, मझर खान, सिद्धार्थ शिंगारे यांच्यासह दलित पक्ष, संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

पप्पू कागदे म्हणाले, मी स्वतः निवडणूक लढण्यास तयार नव्हतो. समाज, कार्यकर्त्यांनी विनंती केली म्हणून जबाबदारी घेतली. पण मी कोणाच्याही दारात तिकीट मागायला गेलो नव्हतो. मला त्यांनीच बोलावलं. आ. विजयसिंह पंडित यांनी सांगितले की अजित दादा पवार यांचा निरोप असून निवडणूक लढवावी अशी विनंती केली आहे.त्यानंतर रामदास आठवले यांच्याशी चर्चा करून सर्व तांत्रिक अडचणी दूर करुन घड्याळ या चिन्हावर लढायला तयार झालो. परंतू प्रस्थापितांचा डाव वेगळाच होता. आमचा वापर करून शेवटच्या क्षणी माझी उमेदवारी कापली. खऱ्या एससी महिलेला तिकिट न देता मुजीब शेख यांच्या सासूला तिकिट देणे म्हणजे समाजाचा उघड अपमान आहे. ही निवडणूक नाही, हा डुप्लिकेट खेळ आहे. तिकीट वाटपात मोठा आर्थिक व्यवहार झाल्याचा गंभीर आरोप करत कागदे म्हणाले–

भू-माफिया, वाळू-माफिया आणि वक्फ बोर्डाच्या जमीन व्यवहारांसाठी घुसखोरी केली गेली. पैसा आणि दबाव तंत्रांचा वापर करून घड्याळ चिन्हाच्या तिकीटाचा लिलाव केले. भूमाफियांना उमेदवारी देवून नगर परिषद ताब्यात घेण्यासाठी व वक्फ बोर्डाच्या असलेल्या जमिनी भू माफियांच्या नावे करण्यासाठी प्रस्थापितांकडून मागासवर्गीय उमेदवारांना निवडणूक लढण्यापासून दूर ठेवण्याचे काम करण्यात येत आहे. अमरसिंह पंडित आणि आ. विजयसिंह पंडित यांचे थेट नाव घेवून म्हणाले की, बीडमध्ये राजेशाही चालणार नाही. लोकशाहीच्या नावाखाली डावपेच करणाऱ्यांना आम्ही वेशीबाहेर टाकू. समाजावर कुणीही मनमानी लादू शकत नाही. या पत्रकार परिषदेत अजिंक्य चांदणे म्हणाले, मागासवर्गीयांना चाळीस वर्षानंतर आरक्षणाच्या माध्यमातून नगर अध्यक्षपदाची संधी मिळाली होती. परंतु राजकीय प्रस्थापितांकडून मागासवर्गीयांना वंचित ठेवण्याचे षडयंत्र करण्यात आले आहे. पत्रकार परिषदेमुळे बीडचे राजकीय वातावरण आणखी तापले असून प्रस्थापित पक्षांवर आंबेडकरी समाजाचा रोष तीव्र झाला आहे.

### घड्याळाला एकही मत नाही!

या पत्रकार परिषदेत राष्ट्रवादी अजित पवार गटाला, एकही मत नाही, अशी ठाम भूमिका आंबेडकरी समाजाने घेतली आहे. त्यासाठी येत्या २५-२६ नोव्हेंबर रोजी प्रस्थापितांना नगर परिषद निवडणूकीत धडा शिकविण्यासाठी बीड शहरातील आंबेडकरी चळवळीतील सर्वपक्षीय पदाधिकारी व्यापक बैठक घेऊन निर्णय घेतला जाईल.

# हमारा शौचालय हमारा भविष्य मोहिमेत सहभागी व्हा –सीईओ जतीन रहमान

बीड । प्रतिनिधी



केंद्र व राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार जागतिक शौचालय दिनानिमित्त विभागामार्फत हमारा शौचालय, हमारा भविष्य ही विशेष मोहीम सुरू करण्यात येत आहे. या उपक्रमात जिल्यातील सर्व १३५६ गावात वैयक्तिक व सार्वजनिक शौचालये दुरुस्ती व रंगरंगोटी करून वापरात आणण्यात येणार आहे . मानवी हक्क दिनापर्यंत म्हणजे १० डिसेंबर २०२५ पर्यंत राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमात सर्वांनी सहभागी व्हावे असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांनी केले आहे.


जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायती या मोहिमेत असणार आहेत . या स्पर्धेत आरोग्य ,शिक्षण , महिला व बाल कल्याण, उमेद या विभागांनी सहभागी व्हावे असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केले आहे. शौचालये ही केवळ सोयीची नव्हे तर आरोग्य, प्रतिष्ठा व सुरक्षिततेची हमी देणारी मूलभूत गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. या मोहिमेअंतर्गत जिल्ह्यातील सर्व गावातील वैयक्तिक शौचालये व सामुदायिक शौचालयांची तपासणी, दुरुस्ती, देखभाल व सुशोभीकरणावर विशेष लक्ष देण्यात येणार आहे. अपूर्ण किंवा दुरुस्तीची गरज असलेली सार्वजनिक शौचालये ◀◀ पान ३ वर

# माळेवाडी शिवारात अवैध वाळू वाहतूक करणारा ट्रॅक्टर पकडला

बीड । प्रतिनिधी

शिरूर तालुक्यातील माळेवाडी येथे शिंदफणा नदी पात्रातून अवैध वाळू घेऊन जाताना ट्रॅक्टर शिरूर पोलिसांनी ताब्यात घेतला.

दिनांक १९/११/२०२५ रोजी १०.३० वाजता शिरुर पोलीस ठाण्याचे पोलीस हवालदार १५३० तुषार गायकवाड पोलीस अंमलदार २२ ७९ सुनील बहिर वाल हे बीट मध्ये पेट्रोलिंग करत असताना गोपनीय बातमीदारामार्फत माहिती प्राप्त झाली की, माळेवाडी शिवारातील सिंदफणा नदीपात्रात एक ट्रॅक्टर वाळू घेऊन जात आहे.त्यानुसार घटनास्थळावर जाऊन छापा मारला असता तेथे एक हिरव्या रंगाचे जॉन डीअर ट्रॅक्टर त्याला ट्रॉली जोडलेली व त्यात वाळू भरलेली मिळून आली .चौकशीत सदर ट्रॅक्टर



चालकाचे नाव हनुमंत रामभाऊ काशीद रा. फुलसांगवी, तालुका शिरूर असे असून, वाळू अनधिकृतपणे वाहतूक करत असल्याचे निदर्शनास आले. या संदर्भात पोलीस स्टेशन शिरुर कासार येथे गु.र.नं. ३२०/२०२५ कलम ३०३(२), बी.एन.एस. अन्वये ट्रॅक्टर चालक हनुमंत रामभाऊ काशीद रा. फुलसांगवी, तालुका शिरूर यांचे विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर आरोपीकडून खालीलप्रमाणे मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

ट्रॅक्टर किंमत ८,००,०००/-, वाळू किंमत ८,०००/- एकूण मुद्देमाल किंमत ८,०८,०००/- ताब्यात घेतला. ही कारवाई वरीष्ठांच्या मार्गदर्शनाखाली शिरूर कासार पोलीस ठाणे चे सहा. पोलीस निरीक्षक प्रवीण जाधव, पोह/१५३० गायकवाड, पोशी २२७९ सुनील बहिरवाळ यांनी केली. सदर कारवाईमुळे अवैध वाळू वाहतूक करणाऱ्यांना प्रतिबंध लागून अशा प्रकारच्या बेकायदेशीर वाहतुकीवर आळा बसण्यास मदत झाली आहे.

# नगराध्यक्षपदाचे उमेदवार राजकिशोर मोदी यांच्या उमेदवारी अर्जावरील आक्षेप फेटाळला

अंबाजोगाई । प्रतिनिधी

लोकविकास महा आघाडीचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार राजकिशोर कांताप्रसाद मोदी यांच्या उमेदवारी अर्जावर विरोधी उमेदवार नंदकिशोर मुंदडा यांनी घेतलेल्या आक्षेपाचे खंडन करून तो आक्षेप निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी फेटाळला . मंगळवार दि १८ रोजी नामनिर्देशन अर्जाच्या पडताळणी मध्ये कोणताही दोष किंवा त्रुटी आढळुन न आल्याने राजकिशोर मोदी यांचा नगराध्यक्ष पदाचा उमेदवारी अर्ज वैध ठरला गेला.

नगर परिषद निवडणुका जाहीर झाल्या पासूनच लोकविकास महा आघाडीचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार राजकिशोर मोदी यांना कोंडीत पकडण्यासाठी वारंवार साम, दाम, दंड ,भेद असे सर्व प्रकार विरोधकांनी वापरून रडीचा डाव सुरू केला आहे.राजकिशोर मोदी यांच्या सहकार्यांना विविध आमिषे , दडपशाही ,धमक्या देऊन त्यांचे भारतीय जनता पक्षात पक्ष प्रवेश घडवून आणले. तरी सुद्धा जनतेच्या मनातील राजकिशोर मोदी यांच्या बद्दलची आपुलकीची भावना कमी होत नसल्याने विरोधक बिथरून गेल्याचे दिसून येत आहेत. एवढे करूनही राजकिशोर मोदी हे कुठेच व कशातच कात्रीत सापडत नसल्याचे लक्षात येताच त्यांना आता कागदपत्रांत कोठे गाठता येते का? आणि काहीपण करून मोदी यांना निवडणुकीतून बेदखल करता येते का? यासाठीचे प्रयत्न भारतीय जनता पक्ष तथा नगराध्यक्ष पदाचे उमेदवार नंदकिशोर मुंदडा यांच्याकडून ◀◀ पान ३ वर

# सौताडा परिसरात बिबट्याने घेतला गाईचा बळी



## आठ दिवसात तिसरा बळी; वनविभाग झोपेतच

बीड । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील सौताडा परिसरात बिबट्याने यापूर्वी दोन गावांमध्ये दोन शेळ्या खाल्ल्या आता हा तिसरा प्रकार सौताडा येथील मंदिराजवळ घडला असून बिबट्याने सोमवारी रात्री एका गायीचा फडशा पाडला. या प्रकाराने परिसरात दहशत पसरली असून वनविभाग मात्र झोपेतच आहे. या ठिकाणी पिंजरा लावावा अशी मागणी परिसरातील नागरिक करत आहेत. या संदर्भात आ.सुरेश धस यांनी संबंधित अधिकाऱ्यांना सूचना देऊनही याची दखल घेण्यात आली नाही हे विशेष.

गेल्या दोन-तीन दिवसांमध्ये बिबट्याची सौताडा परिसरामध्ये दहशत पसरली असून यापूर्वी दोन गावांमध्ये या बिबट्याने शेळ्या फस्त केल्या. या संदर्भात वन विभागाला कळवूनही कसली दाखल घेण्यात आली नाही. त्यानंतर सोमवारी रात्री सौताडा येथे मंदिराजवळ बिबट्याने एका गाईचा फडशा पाडला. या प्रकाराने सौताडा परिसरातील नागरिक दहशतीत ◀◀ पान ३ वर

### आ. धस यांच्या सूचना केरात

यासंदर्भात या भागाचे आमदार सुरेश धस यांनी पहिल्या दोन शेळ्या खाल्ल्यानंतर आणि नागरिकांनी याची माहिती दिल्यानंतर संबंधित खात्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्याला या बिबट्याचा बंदोबस्त करावा अशी सूचना केली होती. मात्र याची दखल घेण्यात आली नाही. त्यामुळे सौताडा येथे मंदिराजवळ बिबट्याने गाय फस्त केली. हा तिसरा प्रकार घडला. याची वेळीच दखल घेण्यात आली असती तर हा प्रकार घडला नसता. अशी नागरिकांची भावना आहे. आ.धस यांनी सूचना देऊनही त्यांच्या सूचनेला केराची टोपली दाखवल्याचे दिसत आहे.

# शहराच्या विकासासाठी शिफा बिलाल चाऊस यांची नगराध्यक्ष पदाची उमेदवारी–मोहन जगताप

## टक्केवारी खाणाऱ्या आमदाराला हद्दपार करणार–बाबुराव पोटभरे

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव शहराच्या विकासासाठी समृद्धीसाठी आणि नागरी समस्या सोडवण्यासाठी सौ.शिफा बिलाल चाऊस यांना नगराध्यक्ष पदाची उमेदवारी देण्यात आली आहे. चाऊस यांच्या माध्यमातून आम्ही शहराचा विकास करणार असल्याचे मोहन जगताप म्हणाले.

तर विकास कामात टक्केवारी खाऊन भ्रष्टाचार करणाऱ्या आ. प्रकाश सोळंके यांना नगर परिषदेच्या निवडणुकीतून हद्दपार करणार असल्याचे बाबुराव पोटभरे यांनी सांगितले.मोहन जगताप यांच्या पक्ष कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत शरदचंद्रजी पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नगराध्यक्ष नगरसेवक पदाचे उमेदवार बुधवार दि.१९ रोजी जाहीर करण्यात आले.



यावेळी ते पत्रकारांना बोलताना ती म्हणाली की, शहरात नागरी समस्या प्रलंबित आहेत. भ्रष्टाचाराने कळस गाठला आहे.अशा स्थितीत राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गट निवडणुकीच्या मैदानात उतरला असून शहराच्या विकासाला आम्ही प्राधान्य देणार आहोत. असं सुतोवाचन पत्रकार परिषदेत पक्षाचे नेते मोहन जगताप यांनी केले. दरम्यान नाट्यगृह, आठवडी बाजार, पिण्याचा पाण्याचा प्रश्न सोडवणार असल्याचेही ◀◀ पान ३ वर

# स्वस्तात विमानाची तिकिटे काढून देतो अशी बतावणी करून २५ लाखांची फसवणूक

बीड । प्रतिनिधी

बीड शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल झाली होती की, तक्रारदार अण्णासाहेब गोटीराम राठोड यांचा मुलगा विदेशात शिक्षणासाठी राहत असून, त्याच्या येण्या-जाण्यासाठी विमानाची तिकिटे स्वस्तात मिळवून देतो अशी खात्री देत आरोपी कुणाल भाऊसाहेब चव्हाणके, वय २९ वर्ष, रा. चासनळी, ता. कोपरगाव, जि. अहिल्यानगर याने तक्रारदाराची तब्बल २५,००,००० इतकी फसवणूक केली होती.



**आरोपीस लोणावळ्यातून अटक बीड शहर डीबी पथकाची कारवाई**

गुन्हा दाखल झाल्यानंतर आरोपी हा फरार होता आणि बराच काळ सापडत नव्हता. बीड शहर पोलीस ठाण्याच्या पथकाने तातडीने तपास सुरू करून, तांत्रिक तपास आणि गुप्त माहितीच्या आधारे आरोपीचा शोध लावून आरोपीला लोणावळा जिल्हा पुणे ग्रामीण येथून ताब्यात घेवून अटक करण्यात यश मिळवले आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांच्या मार्गदर्शनाखाली, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी, श्रीमती पूजा पवार यांच्या देखरेखीखाली करण्यात आली. कारवाईत पोलीस निरीक्षक शीतलकुमार बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक ◀◀ पान ३ वर

# कल्याण स्वामी संस्थानच्या भव्य कलशारोहन सोहळ्यानिमित्त सप्ताहास प्रारंभ

**आष्टी । प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील गानकोकीळा ह.भ.प.साध्वी सोनली दिदी करपे महाराज यांचे नियोजन व मार्गदर्शनाखाली महंत चैतन्य महाराज यांचे आयोजन तसेच श्री रोकडेश्वर श्री गुरु कल्याणस्वामी व श्री गुरु गुलाबबाबा यांच्या कृपेने चकलंबा येथील श्री क्षेत्र सद्गुरु कल्याण स्वामी संस्थानचा भव्य कलशरोहन सोहळा,अखंड हरिनाम सप्ताह,११ कोटी नामजप व त्रिकाळ हरिपाठ सोहळ्यास प्रारंभ झाला आहे.

कलशरोहन श्री नारायणमुनी (सुरत नवसारी),ह.भ.प. शिवाजी महाराज नारायणगड, महंत नामदेव शास्त्री भगवानगड,ह.भ.प.महादेव महाराज भारती,महंत विठ्ठल महाराज शास्त्री गहिनीनाथगडकर,ह.भ.प. नवनाथबाबा गोरक्षनाथटेकडी, महंत स्वामी जनार्धन महाराज, महंत त्रिवेंद्रानंद सरस्वती,महंत राधाताई महाराज,महंत शुक्लभारती महाराज,महंत दत्ता महाराज गिरी,महंत प्रल्हाद महाराज विघ्ने,महंत वैद्यनाथ शास्त्री,महंत विवेकानंद शास्त्री, विजय महाराज सुलाखे,महंत शंकर महाराज,महंत नामदेव महाराज शेकटेकर,महंत स्वामी योगीराज महाराज,श्रीहरि महाराज पवार,महंत बाबा महाराज गिरी,महंत रामगिरी, महंत सुरेश महाराज कोळेकर, वाळकेबाबा यांच्या शुभहस्ते होणार आहे.या सप्ताहात मंगळवार दि.१८ नोव्हेंबर रोजी रात्री समाजप्रबोधनकार ह.भ. प.निवृत्ती महाराज इंदुरीकर यांचे हरीकिर्तन झाले.बुधवार दि.१९ नोव्हेंबर रोजी रात्री महंत आदिनाथ महाराज तारकेश्वरगडकर यांचे हरीकिर्तन झाले. आज गुरुवार दि.२० नोव्हेंबर रोजी रात्री गोरक्षक रामायणाचार्य ह.भ.प.संजय महाराज पाचपोर यांचे हरी किर्तन होणार आहे. शुक्रवार दि.२१ नोव्हेंबर रोजी रात्री ह.भ.प.गहिनीनाथ महाराज औसेकर, शनिवार दि.२२ नोव्हेंबर रोजी रात्री ह.भ.प.अच्युत महाराज दस्तापूरकर,रविवार दि.२३ नोव्हेंबर रोजी रात्री धर्मगुरु अमृताश्रम स्वामी महाराज बीड तर सोमवार दि.२४ नोव्हेंबर रोजी या धार्मिक कार्यक्रमाच्या संयोजिका साध्वी सोनाली दिदी करपे यांचे महाराज यांचे हरिकीर्तन होणार आहे. मंगळवार दि.२५ नोव्हेंबर रोजी सकाळी ९ ते ११ यावेळात कीर्तन केसरी अक्रूर महाराज साखरे यांचे काल्याचे कीर्तन होणार आहे.या धार्मिक कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन भागवताचार्य ह.प.भ.सोनाली दिदी यांनी केले आहे.

# आ.सुरेश धस यांच्या प्रयत्नांमुळे अंमळनेर परिसरात दिवसा वीजपुरवठा

पाटोदा । प्रतिनिधी

अमळनेर परिसरातील डोंगराळ भागात बिबट्याच्या वाढत्या वावरामुळे रात्रीच्या वीजपुरवठ्यामुळे शेतकऱ्यांना अंधारात शेतीला जाणे जीवघेणे ठरत होते. ही गंभीर परिस्थिती आमदार सुरेश आण्णा धस यांच्या निदर्शनास आणताच त्यांनी महावितरण अधिकाऱ्यांना तातडीने कार्यवाहीचे आदेश दिले. त्यानुसार महावितरणकडून त्वरीत निर्णय घेत बुधवार, १९ नोव्हेंबरपासून अमळनेर परिसरात दिवसा वीजपुरवठा सुरू करण्याची अंमलबजावणी करण्यात येत असल्याची माहिती उपअभियंता ए. एन. शेख यांनी दिली. नवीन



वेळापत्रकानुसार अमळनेर फिडर सकाळी ६ ते १२ आणि हातोला फिडर दुपारी १२ ते ६ अशी वेळ निश्चित झाली आहे. या निर्णयामुळे दहा-पंधरा गावांतील शेतकऱ्यांना बिबट्याच्या भीतीतून मोठा दिलासा मिळाला असून कोतनचे सरपंच महेश खेंगरे व शेतकरी कोमखले यांनी आमदार सुरेश आण्णा धस यांचे मनापासून आभार मानले आहेत.

# शिवरायांचा मुस्लिम मावळा समीर शेख लोकशक्ती राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्काराने सन्मानित

आष्टी । प्रतिनिधी

सामाजिक व पत्रकारीच्या माध्यमातून नेहमीच समाजहिताचे उपक्रम राबवणारे, शिवरायांचा मुस्लिम मावळा तथा आ. लोकनेते सुरेश धस यांचे स्वीय सहाय्यक, आष्टी तालुक्यातील सांगवी पाटण येथील सर्व सामान्य शेतकरी कुटुंबात जन्मलेले समीर शेख शनिवारी दैनिक लोकशक्तीच्या पहिल्या वर्धापन दिनानिमित्त 'लोकशक्ती महाराष्ट्र गौरव आदर्श शिक्षक' हा राज्यस्तरीय पुरस्कार देऊन सन्मानित झाले.



सिने अभिनेत्री चित्रा दिक्षित, नागपूर येथील अप्पर पोलीस अधीक्षक डॉ. दत्ताराव राठोड, 'गावरान मस्ती' फेम वैभव कुऱ्हाडे (गंठणकुमार), ज्येष्ठ साहित्यिक ऐश्वर्य पाटेकर, डॉ. कैलास दौंड, 'झुंजार नेता'चे उपसंपादक उत्तमराव बोडखे, संपादक विजय लेंडाळ, सहसंपादक इम्रान शेख, पत्रकार जावेद सय्यद व इतर मान्यवरांच्या हस्ते दि. १५/११/२०२५ रोजी लोकशक्ती राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार समीर बादशहा शेख यांना देऊन सन्मान करण्यात आला. तर या आगोदर ०७/०९/२०२५ या दिवशी राज्यस्तरीय युवक आधार शिव रत्न पुरस्कार व २०२४/२५ या वर्षाचा ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# बारामतीत राजकारण तापलं, शरद पवारांच्या राष्ट्रवादी शहराध्यक्षाला मारहाण; सुप्रिया सुळेंचा संताप

बारामती । प्रतिनिधी

पुणे : राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची रणधुमाळी आता वेगाने सुरु असून काही ठिकाणी वादाच्या घटना घडत आहेत. सोलापूर जिल्ह्यातील अनगर येथे नगरपंचायत निवडणुकी झालेल्या राड्यानंतर आता बारामती तालुक्यातील माळेगाव बु. नगरपंचायतीतही वादाची ठिणगी पडली आहे. एकीकडे बारामती (इरीरारींळ) नगर परिषदेच्या नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाकडून सचिन सातव यांच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे. सचिन सातव यांना नगराध्यक्षपदाची उमेदवारी राष्ट्रवादी काँग्रेसकडून घड्याळाच्या चिन्हावर देण्यात आल्याने येथील राजकीय नाट्य संपुष्टात आले आहे. मात्र, बारामतीमधील माळेगाव बु. नगरपंचायतीच्या निवडणुकीत वाद झाल्याचं समोर आलं आहे. येथील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या शहराध्यालाच मारहाण करण्यात आल्याने राजकीय वातावरण तापलं आहे.




बारामतीसाठी अजित पवार गटाकडून नगराध्यक्ष पदाच्या उमेदवाराचा सस्पेन्स ठेवण्यात आला होता. अखेर तो सस्पेन्स दूर झाला असून सचिन सातव यांना उमेदवारी देण्यात आली आहे. सातव हे बारामती सहकारी बँकेचे विद्यमान अध्यक्ष आहेत. याशिवाय यापूर्वी सचिन सातव हे बारामती नगरपरिषदेचे नगरसेवक देखील राहिले आहेत. दरम्यान,माळेगाव नगरपंचायतीच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू असताना शरद पवार गटाच्या शहराध्यक्षाला मारहाण झालेली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या शहराध्यक्षाला मारहाण झाल्याची धक्कादायक घटना घडली. बारामती तालुक्यातील माळेगाव येथील शहराध्यक्ष नितीन तावरे यांना मारहाण झाल्यानंतर खासदार सुप्रिया सुळे यांनी ट्विट करुन संताप व्यक्त केला. बारामती तालुक्यातील माळेगाव बु.नगरपंचायतीची निवडणूक लढवित असल्याचा राग मनात धरुन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे शहराध्यक्ष नीतीन तावरे यांच्यावर समाजकंटकांनी प्राणघातक हल्ला केला. लोकशाही प्रक्रियेत निवडणूक लढविणे हा नागरीकांचा अधिकार आहे. या अधिकारावरच आक्रमण करुन नागरीकांचा आणि विरोधी पक्षाचा आवाज बंद करण्याचा प्रकार अतिशय संतापजनक आणि दुर्दैवी आहे. आम्ही सर्वजण या भ्याड हल्लूल्याचा निषेध करतो, असे म्हणत राष्ट्रवादीच्या नेत्या आणि खासदार सुप्रिया सुळे यांनी माळेगाव हल्ल्याबाबत आपला संताप व्यक्त केला. तसेच, माझी शासनाला विनंती आहे की, कृपया हा हल्ला करणाऱ्यांवर कठोरात कठोर कारवाई करावी. नीतीन तावरे हे या हल्ल्यात जखमी झाले आहेत, ते लवकरात लवकर बरे व्हावे, अशी प्रार्थना देखील त्यांनी केली.

# व्यवहार रद्द करणारे अजित पवार कोण? अंजली दमानियांचा सवाल

**पुणे । प्रतिनिधी**

मुंढवा जमीन व्यवहार प्रकरण रद्द करणारे उपमुख्यमंत्री अजित पवार कोण? भारतीय संविधानात उपमुख्यमंत्रिपद नाही. अजित पवार अर्थमंत्री आहेत. कायद्यानुसार अर्थमंत्री दुसऱ्या प्रकरणात लक्ष घालू शकत नाही. व्यवहार फक्त कायद्यानुसारच रद्द होऊ शकतो. मात्र, दोन व्यक्तींनी घोटाळा केला असेल, तर त्यांना व्यवहार रद्द करण्याचा कोणताही अधिकार नसल्याचे सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी सांगितले.



दमानिया यांनी मुंढवा येथील जमिनीची पाहणी केली. त्यानंतर त्या माध्यमांशी बोलत होत्या. दमानिया म्हणाल्या, परवानगी नसल्याने मुंढव्याच्या जमिनीची पाहणी करण्यास मनाई करण्यात आली. आम्हाला या प्रकरणाची चौकशी करायची होती. मात्र जमिनीची पाहणी करण्यास मनाई करण्यात आली. बेंजामिन नावाचे अधिकारी माझ्याशी उद्धट बोलले.

सुरुवातीला २१ कोटी रुपये देऊन व्यवहार रद्द होणार असे सांगण्यात येत होते, मात्र महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणतात की, आम्हाला पैसे नको. आम्हाला तो व्यवहार रद्द करून हवा आहे. पुढे ते म्हणतात की, २१ कोटी नाही तर ४२ कोटी घेऊन व्यवहार रद्द होणार. मात्र कायद्याने हा व्यवहार उपमुख्यमंत्री अजित पवार किंवा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस किंवा पंतप्रधान नरेंद्र मोदीदेखील रद्द करू शकत नाहीत . कारण व्यवहार रद्द करण्याचे अधिकार त्यांच्याकडे नाही. व्यवहार कायद्याने रद्द होतो आणि त्यासाठी पाच कायदे आहेत.अजित पवार यांनी राजीनामा द्यावा. राजकारणी सगळ्या जमिनी गिळंकृत करीत आहेत. सरकारने हा व्यवहार रद्द केल्यास त्याच्याविरोधात न्यायालयात जाणार असल्याचेही त्यांनी या वेळी सांगितले.

# आगाखान पॅलेसच्या आवारातून चंदनाचे झाड चोरीस

**पुणे । प्रतिनिधी**

आगाखान पॅलेसच्या आवारातून चंदनाचे झाड कापून नेल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी चंदन चोरट्यांविरुद्ध येरवडा पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

याबाबत आगाखान पॅलेसमधील उद्यान सहाय्यक ओंकार गरुड (वय ४०) यांनी येरवडा पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, येरवडा भागातील आगाखान पॅलेसच्या आवारात कस्तुरबा गांधी खादी ग्रामोद्योग विद्यालय आहे. मंगळवारी (१८ नोव्हेंबर) मध्यरात्री चोरटे आगाखान पॅलेसच्या आवारात शिरले. चोरट्यांनी कस्तुरबा गांधी खादी ग्रामोद्योग विद्यालयाच्या आवारातील चंदनाचे झाड कापले. चंदनाच्या झाडाचा बुंधा करवतीने कापण्यात आला. बुंधा चोरून चोरटे पसार झाले. मंगळवारी सकाळी चंदनाचे झाड कापून नेल्याचा प्रकार उघडकीस आल्यानंतर पोलिसांकडे तक्रार देण्यात आली. वरिष्ठ पोलिस निरीक्षक अंजुम बागवान यांनी घटनास्थळी भेट दिली. पसार झालेल्या चंदन चोरट्यांचा शोध घेण्यात येत असून, सहायक पोलिस निरीक्षक जऱ्हाड तपास करत आहेत. पोलिसांनी आगाखान पॅलेसच्या आवारातील सीसीटीव्ही चित्रीकरण ताब्यात घेतले आहे. दरम्यान, गेल्या काही दिवसांपासून शहरात चंदनचोरीच्या घटना वाढीस लागल्या आहेत. प्रामुख्याने शासकीय कार्यालये, संशोधन संस्थांच्या आवारातील चंदनवृक्षांची चोरी होत असल्याचे निदर्शनास आले आहे.

# प्रवाशांची लूट करणारी टोळी अखेर जेरबंद!


**पुणे । प्रतिनिधी**

पुणे रेल्वे स्टेशन परिसरात प्रवाशांना धमकावून लुटणाऱ्या चोरट्यांच्या टोळीला बंडगार्डन पोलिसांनी मालधक्का परिसरातून जेरबंद केले. जानमोहम्मद नसरुद्दीन शेख (वय ३२, रा. पीर वस्ती, वडकी, सासवड रस्ता), सतीश ज्ञानेश्वर शिरोळे (वय ३५), खुद्दाराज अंजीलप्पा विभुती (वय १९), शिवप्रकाश कुमार (वय २३), चौपाट्या उर्फ राजेश मंगल मंडल अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. याप्रकरणी, पोलिस शिपाई शरद गायकवाड यांनी बंडगार्डन पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार बंडगार्डन पोलिस ठाण्यात पाच जणांच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शेख, शिरोळे, विभूती, मंडल, कुमार हे फिरस्ते आहे. पुणे रेल्वे स्टेशन, स्वारगेट परिसरात त्यांचा वावर आहे. बाहेरगावाहून येणाऱ्या प्रवाशांना धमकावून त्यांच्याकडील मोबाइल, तसेच रोकड हिसकावण्याचे गुन्हे त्यांनी केले आहे. पुणे स्टेशन येथील मालधक्का रस्त्यावर चोरट्यांची टोळी थांबली असून, प्रवाशांना लुटण्याच्या तयारीत चोरटे असल्याची माहिती बंडगार्डन पोलिसांना मिळाली. त्यानंतर पोलिसांनी सापळा लावून आरोपींना पकडले. त्यांच्याकडून तीक्ष्ण शस्त्रे , मिरची पूड, दोरी असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. वरिष्ठ पोलिस निरीक्षक संतोष पांढरे, निरीक्षक नीळकंठ जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. पोलिस उपनिरीक्षक संदीप खेडकर तपास करत आहेत.

# दोन बिबट्यांचा मेंढ्यांच्या कळपावर हल्ला; मेंढपाळ महिलेने केला प्रतिकार

**नारायणगाव । प्रतिनिधी**

उसातून आलेल्या दोन बिबट्यांनी शेतात चरत असलेल्या मेंढ्याच्या कळपावर हल्ला केला. या हल्ल्यात दोन मेंढ्या ठार झाल्या. मेंढपाळ महिलेने बिबट्यांचा हल्ला परतवून लावण्यासाठी आरडाओरडा केला. दरम्यान एक बिबट्या मेंढी घेऊन उसाच्या शेतात गेला. महिलेच्या प्रतिकारामुळे एक बिबट्या ठार केलेली मेंढी सोडून उसाच्या शेतात निघून गेला.



बिबट्याच्या हल्ल्यातून सुदैवाने मेंढपाळ महिला व मेंढपाळाचा लहान मुलगा वाचला. अंगावर शहारे आणणारी ही घटना आज दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास नारायणगाव जवळील गव्हाळी मळा शिवारात घडली. या भागात बिबट्यांच्या वाढलेल्या हल्ल्यामुळे उपस्थित नागरिकांनी संताप व्यक्त केला.

पळशी वनकुटे (ता. पारनेर) येथील लिलाबाई चिमा केसकर (वय-३०) यांनी नारायणगांव येथील गव्हाळी मळा शिवारातील मोकळ्या शेतात मेंढ्यांचा वाडा लावला होता. दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास बाबू शेटे यांच्या उसाच्या शेताजवळ असलेल्या मोकळ्या शेतात मेंढ्या चरत होत्या. दरम्यान अचानक उसातून उसाच्या शेतातून आलेल्या दोन बिबट्यांनी मेंढ्याच्या कळपावर हल्ला केला. यावेळी मेंढ्यांसोबत लिलाबाई केसकर व त्यांचा लहान मुलगा होता.लिलाबाई यांनी आरडाओरडा करून हातातील काठी आपटून बिबट्याचा प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला. दरम्यानच्या काळात एक बिबट्या मेंढी घेऊन उसाच्या शेतात गेला.तर दुसऱ्या बिबट्याने तोंडातील मेंढी सोडून उसाच्या शेतात धूम ठोकली. बिबट्याच्या जबड्यातून मेंढी सुटली असली तरी ती मृत झाली. सुदैवाने बिबट्याने महिला व लहान मुलावर हल्ला केला नाही. महिलेचा आरडाओरडा ऐकून अमित शेटे, उपसरपंच बाबू पाटे, सुरज वाजगे, राजू भोर यांच्यासह इतर शेतकरी घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी वनरक्षक ज्ञानेश्वर पवार यांना याबाबतची माहिती दिली. संतप्त नागरिकांनी बिबट्याला शूट करण्याची मागणी केली.

# पोलिस गणवेशात समोर आला आणि व्हिडीओ कॉलवरच ४८ लाख साफ!

**पुणे । प्रतिनिधी**

मनी लॉन्ड्रिंगचा धाक दाखवून तुमचा मोबाईल क्रमांक गैरकृत्याकरीता वापरल्याचे सांगून पोलिस गणवेश परिधान केलेल्या सायबर चोरट्याने व्हिडीओ कॉलवर धाक दाखवत ज्येष्ठाकडून ४८ लाख रुपये उकळल्याचा प्रकार समोर आला आहे.

याप्रकरणी हांडेवाडी रोड हडपसर येथील ६९ वर्षीय व्यक्तीने काळेपडळ पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार पोलिसांनी सायबर चोरट्यांच्या विरुद्ध माहिती तंत्रज्ञान कायद्यानुसार फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सायबर चोरट्यांनी फिर्यादींना फोन करून मनी लॉन्ड्रिंगचा धाक दाखविला. तुमचा मोबाईल गैरकृत्यात वापरला आहे. फिर्यादींना विश्वास वाटावा म्हणून सायबर चोरट्याने पोलिसांचा गणवेश परिधान करून व्हिडीओ कॉलद्वारे त्यांना दम भरला. त्यानंतर फिर्यादींच्या मालमत्तेची माहिती सायबर चोरट्यांनी घेतली व्हिडीओ कॉलवर त्याची पडताळणी करायची आहे, असे सांगून सर्व माहिती घेतली. तुम्ही माहिती दिली नाही तर तुम्हाला दंड तसेच कारावास होईल, असे सांगून बँक खात्याची पडताळणी करायची आहे, असे म्हणून बँक खात्यावर पैसे पाठवून घेतले. अशाप्रकारे सायबर चोरट्यांनी फिर्यादींची तब्बल ४८ लाख रुपयांची फसवणूक केली.

# डिसेंबरमध्ये ३९ वी पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन पूर्ण मॅरेथॉनच्या मार्गात मोठा बदल

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन स्पर्धा एकोणचाळीसाव्या वर्षात पदार्पण करत आहे. यंदा पुरुष-महिला पूर्ण मॅरेथॉनच्या मार्गात काहीसा बदल करण्यात आला आहे, अशी माहिती आयोजक ड. अभय छाजेड, वसंत गोखले आणि सुमंत वाईकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

ही मॅरेथॉन स्पर्धा रविवारी (दि. ७ डिसेंबर) पहाटे ३ वाजता सुरू होईल. सणस मैदान परिसरातील हॉटेल कल्पना-विश्व चौकातून या ४२.१९५ किलोमीटरच्या पुरुष व महिला पूर्ण मॅरेथॉनला झेंडा दाखवून सुरुवात करण्यात येईल. तसेच, पहाटे ३.३० वाजता पुरुष- महिला (२१.०९५) अर्ध मॅरेथॉन, १० कि.मी. सकाळी ६.३० वाजता, ५ कि.मी. सकाळी ७.०० वाजता आणि सकाळी ७.१५ वाजता व्हील चेअर ३ कि.मी. या स्पर्धांना सुरुवात होईल. सणस मैदानासमोरील हॉटेल कल्पना-विश्व चौकातून निघून सणस चौक - बाजीराव रस्ता - नगरकर तालीम- लक्ष्मी रोड- कुलकर्णी पेट्रोल पंप तेथून फिरून शनिवारवाडा- शिवाजी पूल- मनपा भवन- मॉडर्न कॅफे- जंगली महाराज रोड- डेक्कन जिमखाना- संभाजी महाराज पुतळा- खंडूजीबाबा चौक- कर्वे रस्ता- कर्वे पुतळा- डावीकडे



वळून इराणी कॅफे- करिश्मा बिल्डिंग- म्हात्रे पूल येथे वळून मेहेंदळे गॅरेज- डी. पी. रोड- जोशी किचन- पंडित फार्म- राजाराम पूल- सिंहगड रोड- डावीकडून नवशा मारुती- पु. ल. देशपांडे उद्यान- पानमळा- दांडेकर पूल- पर्वती पायथा- महालक्ष्मी चौक- सारसबाग- सणस पुतळा येथून डावीकडे हॉटेल कल्पना-विश्व हा २१.०९५ कि.मी.चा पहिला टप्पा पूर्ण करून तेथूनच दुसरा टप्पा सणस पुतळा- महालक्ष्मी चौक- स्वातंत्र्यवीर सावरकर पुतळ्यासमोरून, खंडोबा मंदिराहून दांडेकर चौक तेथून सरळ सिंहगड रस्ता मार्गे, गणेश मळा, राजाराम पूल, संतोष हॉल, गोयल गंगा चौक, धायरी पुलावरून, नांदेड सिटीच्या मुख्य प्रवेशद्वारातून आत जाऊन डिस्टेंशन सेंटर येथे सर्कलला गोल वळसा घेऊन परत त्याच मार्गे सणस मैदानाकडे परत येईल व ४२.१९५ ची पूर्ण मॅरेथॉन सणस मैदानात पूर्ण होईल. या मॅरेथॉनमध्ये १५ हजारांहून अधिक स्पर्धक सहभागी होतील, अशी अपेक्षा आहे. स्पर्धेतील विजेत्यांना पुणे महानगरपालिकेतर्फे ३५ लाख रुपयांची बक्षिसे दिली जातील. पुरुष व महिला मॅरेथॉन व अर्ध मॅरेथॉन गटातील पहिल्या तीन भारतीय क्रमांकांच्या स्पर्धकांना विशेष पारितोषिके देण्यात येतील. या वर्षी इथियोपिया, केनिया, टांझानिया, मॉरिशस इत्यादी देशांतून आत्तापर्यंत ७० हून अधिक स्पर्धकांनी नाव नोंदणी केली आहे. याशिवाय सेनादल, रेल्वे, पोलिस, आर्मी स्पोर्ट्स इन्स्टिट्यूट, बॉम्बे सॅपर्स, एसआरपीएफ, एनडीए यांच्याही प्रवेशिका येत आहेत.

# अनुप्रिता डांगे बिनविरोध विजयी; बारामती नगरपरिषदेच्या निवडणुकीत राष्ट्रवादीचे पहिले यश

**बारामती । प्रतिनिधी**

बारामती नगर परिषदेच्या निवडणुकीत प्रभाग क्रमांक २ मधून राष्ट्रवादी काँग्रेस समर्थित अनुप्रिता अक्षय डांगे यांचा एकमेव अर्ज उरल्याने त्यांच्या बिनविरोध निवडीचा मार्ग मोकळा झाला. या प्रभागातून कोणत्याही इतर पक्षाचा उमेदवार अर्ज दाखल न केल्याने अनुप्रिता डांगे यांची निवड बिनविरोध झाली. पहिल्यांदाच सरळ निवडणुकीच्या रिंगणात उतरलेल्या या महिला उमेदवाराच्या अनपेक्षित आणि सहज विजयामुळे अजित पवार समर्थकांमध्ये मोठा उत्साह आणि जल्लोषाचे वातावरण निर्माण झाले आहे. दरम्यान, बारामतीच्या इतर प्रभागांमध्ये निवडणूक चुरशीची होण्याची चिन्हे दिसत आहेत. भारतीय जनता पार्टी, बहुजन समाज पार्टी, तसेच राष्ट्रवादी शरद पवार पक्षाने वंचित बहुजन आघाडी, मनसे, काँग्रेस या पक्षांशी युती करून विविध प्रभागांत उमेदवार उतरवले आहेत. त्यामुळे बारामती नगरपरिषद निवडणूक अधिक रंगतदार होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. बारामतीच्या राजकारणात अजित पवार यांचे समर्थन असलेल्या उमेदवाराचा बिनविरोध विजय ही सुरुवातीची आघाडी निवडणुकीच्या अंतिम निकालाचा सूर ठरवणारी ठरते का? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



# महात्मा गांधी निसर्गोपचार केंद्रात 'राष्ट्रीय निसर्गोपचार दिन' संपन्न !

**पुणे । प्रतिनिधी**

ऊरळीकांचन येथील महात्मा गांधी निसर्गोपचार केंद्रात दि.१८ नोव्हेंबर रोजी आठवा 'राष्ट्रीय निसर्गोपचार दिन' साजरा करण्यात आला. इंडियन नॅचरोपॅथी अँड योगा ग्रॅज्युएट्स मेडिकल असोसिएशन ने या दिनाचे आयोजन केले होते.

१८ नोव्हेंबर या दिवशी १९४५ साली महात्म्य गांधींनी राष्ट्रीय निसर्गोपचार फेडरेशनची स्थापना केली होती. या दिवसाचे औचित्य म्हणून राष्ट्रीय निसर्गोपचार दिन देशभर साजरा केला जातो. ग्रामीण जनजागृती शिबिर तसेच आंतरशालेय पोस्टर आणि क्विझ स्पर्धा या निमित्ताने घेण्यात आल्या.



अँटी-ओबेसिटी ड्राइव्ह अंतर्गत 'स्वस्थ महाराष्ट्र अभियान' ही या निमित्त राबविण्यात आले असून असोसिएशनतर्फे निसर्गोपचाराद्वारे स्थूलत्व व्यवस्थापन या विषयावर व्यापक जनजागृती वर्षभर करण्यात येत आहे. मधुमेह, उच्च रक्तदाब, संधिवात, हृदयरोग यांसारख्या व्याधींवर प्रतिबंध करण्यासाठी नैसर्गिक आणि शाश्वत उपायांविषयी मार्गदर्शन केले जात आल्याचे असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. अभिषेक देविकार यांनी सांगितले. या महत्वपूर्ण उपक्रमासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विशेष शुभेच्छापत्रे पाठवून सक्रिय पाठिंबा व्यक्त केला आहे. राज्यातील विविध रुग्णालये, वैद्यकीय संस्था आणि शैक्षणिक केंद्रांसोबत सहकार्य वाढवण्याचे प्रयत्न आयोजक वर्षभर करणार असून या अभियानातून महाराष्ट्रातील नागरिकांच्या आरोग्यावर सकारात्मक आणि मोजता येण्याजोगा परिणाम साधणे हे असोसिएशनचे उद्दिष्ट आहे.

# बिबट्यांच्या नसबंधीसाठी लवकरच कार्यपद्धती

**पुणे । प्रतिनिधी**

मानव-बिबट वाढत्या संघर्षामुळे बिबट्यांची नसबंदी करण्यास मान्यता मिळाली आहे. त्याबाबत अधिक संघर्ष असलेल्या भागांत वनविभागाकडून प्रायोगिक तत्त्वावर बिबट्यांची नसबंदी करण्यात येणार आहे. पुढील काही दिवसांमध्ये यासाठी आदर्श कार्यपद्धती (एसओपी) तयार करण्यात येणार आहे.



पुण्यासह अहिल्यानगर, नाशिक भागात ऊस गाळप हंगाम सुरू झाल्यापासून बिबट्यांचे मानवी वस्तीवरील हल्ल्यांचे प्रमाण वाढले आहे. पुण्यातील जुन्नर, आंबेगाव आणि शिरूरमध्ये हे प्रमाण अधिक आहे. काही दिवसांपासून बिबट्यांच्या वाढलेल्या हल्ल्यांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. बिबट्यांचे हल्ले कमी होत नसल्याने नागरिकांनी आंदोलनाचा पवित्रादेखील घेतला. सरकारने हा विषय गांभीर्याने घेत, उपाययोजनांसाठी बैठकांचे सत्र सुरू केले. बिबट्यांच्या नसबंदीची मागणी वारंवार नागरिकांमधून सुरू होती. वनमंत्री गणेश नाईक यांनी पुण्यात सोमवारी मादी बिबट्यांच्या निर्बीजीकरणास मान्यता मिळाल्याचे जाहीर केले, तर मंगळवारी मंत्रालयात झालेल्या बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नर बिबट्यांची नसबंदी करण्यावर शिक्कामोर्तब केले, तसेच पुण्यात दोन पुनर्वसन केंद्रे करण्यासाठी तातडीने जागा शोधून आराखडे तयार करण्याचे बैठकीत ठरले आहे.

# पतीला जीव देण्यास प्रवृत्त केलं, पत्नीला सात वर्षांची सक्तमजुरी!

**पुणे । प्रतिनिधी**

पतीला आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी पत्नी आणि सासूला न्यायालयाने सात वर्षे सक्तमजुरी आणि प्रत्येकी २५ हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. 'दररोजच्या भांडणांना कंटाळून पती आत्महत्येसारखे पाऊल उचलू शकतो, याची जाणीव असतानाही आरोपी त्याच्याशी निष्ठूरपणे वागले, त्यांचे वर्तन योग्य नव्हते,' असे नमूद करत अतिरिक्त सत्र न्यायाधीश ए. आय. पेरमपल्ली यांनी हा निकाल दिला.



पत्नी कोमल दीपक चौधरी (वय ३१) आणि सासू शालिनी कृष्णा कोल्हे (वय ५५) अशी शिक्षा झालेल्यांची नावे आहेत. कोमलचा पती दीपक चौधरी यांनी २४ नोव्हेंबर २०१५ ला राहत्या घरी आत्महत्या केली होती. त्यांच्या बहिणीने याबाबत पिंपरी पोलिस ठाण्यात तक्रार दिली होती.

दीपक आणि कोमलचा विवाह २०१० मध्ये झाला. या दोघांचाही हा दुसरा विवाह होता. त्यांना एक मुलगी आहे. दीपक हे तळेगाव दाभाडे येथील एका वाहनउद्योग क्षेत्रातील नामांकित कंपनीत काम करत होते. लग्नानंतर कोमल यांनी क्षुल्लक कारणांवरून दीपक यांना त्रास देण्यास सुरुवात केली. त्याला मारहाण करून उपाशी ठेवत असे. तसेच त्यांच्या आईला शिवीगाळ करत. कोमलने घर घेण्यासाठी दीपक यांना वडिलांकडून कर्ज घ्यायला भाग पाडले. त्यानंतर ते कर्ज फेडण्यासाठी पती व सासूला त्रास देण्यास सुरुवात केली. वारंवार होणाऱ्या या छळाला कंटाळून दीपक यांनी आत्महत्या करण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. सोसायटीतील शेजारच्यांनी वॉचमनच्या मदतीने त्याला वाचविले. मात्र, मानसिकदृष्ट्या अस्थिर अवस्थेत असतानाही, कोमल व तिची आई त्याच्याशी भांडत राहिल्या. त्यामुळे त्याने एका रिकाम्या सदनिकेत गळफास घेत जीवन संपविले, अशी फिर्याद देण्यात आली होती.